




रायगड, नवी मुंबई ◆ वर्ष १६ ◆ अंक २७९
www.ramprahar.com

# राम प्रहर

शनिवार, २७ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

# पेणचा पाणी प्रश्न मार्गी लागणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

## खासदार सुनील तटकरेंच्या विजयाचा विश्वास



(अधिक छायाचित्र पान ८ वर..)

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील बाळगंगा धरण योग्य प्रकारे करून या भागाच्या पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा प्रश्न मार्गी लावण्याचे काम येत्या काळात होणार आहे. येथे आमदार रविशेठ पाटील व माजी आमदार धैर्यशिल पाटील यांची फेविकॉलसारखी मजबूत जोडी जमली आहे. यामुळे महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांचा विजय निश्चित आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.२६) येथे केले.

रायगड लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, आरपीआय, पीआरपी, रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ पेण येथील नगरपालिकेच्या मैदानावर जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी मोदी सरकारच्या जनकल्याणकारी योजनांची माहिती देतानाच विरोधकांच्या निष्क्रियतेवर हल्लाबोल केला. मागच्या काळात पेणला पाणी देण्याचा निर्णय आपण घेतला होता, मात्र मध्यंतरीच्या उद्धव ठाकरे यांच्या सरकारने त्याला स्थगिती दिली. आपले सरकार आल्यावर आपण ती दूर केली. आपण येथील योजना तर पूर्ण करणारच आहोत, शिवाय बाळगंगा धरणातून पेणच्या पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा प्रश्न मार्गी लावणार आहोत. त्यामुळे चिंता करण्याचे काही काम नाही. सगळे प्रश्न सोडवले जातील, असे ते म्हणाले.

या सभेस राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, उमेदवार खासदार सुनील तटकरे, माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील, भाजपचे विधान परिषदेतील गटनेते प्रवीण दरेकर, मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, (पान २ वर..)



## देशात दुसऱ्या टप्प्यात ६४.७० टक्के मतदान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**




लोकसभा निवडणुकीसाठी देशभरातील ८८ मतदारसंघात शुक्रवारी (दि. २६) दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडले. या सर्व मतदारसंघांमध्ये मतदानाची वेळ संपेपर्यंत अर्थात संध्याकाळी ६ वाजेपर्यंत सरासरी ६४.७० टक्के मतदान झाले, तर यापैकी महाराष्ट्रातील आठ मतदारसंघात ५३.७१ टक्के मतदान झाले.

यामध्ये केरळमधील सर्व २०, कर्नाटकातील १४, राजस्थानमधील १३, महाराष्ट्र व उत्तर प्रदेशातील प्रत्येकी आठ, मध्य प्रदेशातील सात, आसाम व बिहारमधील प्रत्येकी पाच, छत्तीसगड व पश्चिम बंगालमधील तीन, मणिपूर, त्रिपुरा व जम्मू व काश्मीरमधील एक मतदारसंघात मतदान प्रक्रिया झाली. यासाठी १६ कोटी मतदार पात्र होते, पण त्यापैकी सुमारे नऊ कोटी मतदारांनीच मतदानाचा हक्क बजावला.

## महायुतीची आज करंजाडेमध्ये सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, आरपीआय, पीआरपी, रासप व मित्रपक्ष महायुतीचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि. २७) सायंकाळी ६.३० वाजता करंजाडे से. ४मधील टाटा पॉवरजवळील मैदानावर सभा होणार आहे.

या सभेस राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उमेदवार खासदार श्रीरंग बारणे, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, विधानसभा प्रमुख नितीन पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस भीमसेन माळी, चिटणीस शिवदास कांबळे, जिल्हाध्यक्ष महादेव पाटील, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, रासपचे अण्णा वावरे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## ईव्हीएमविरोधातील सर्व याचिका फेटाळल्या

**नवी दिल्ली** : लोकसभा निवडणुकीतील दुसऱ्या टप्प्याचे मतदान सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी (दि.२६) ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटबाबत महत्त्वाचा निकाल दिला. निवडणुकांमध्ये ईव्हीएमचाच वापर होईल, पुन्हा मतपत्रिका येणार नाहीत, असे कोर्टाने स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटमधील पावत्यांची शंभर टक्के पडताळणी करण्याच्या सर्व याचिकाही कोर्टाने फेटाळून लावल्या आहेत. पूर्वी ज्या पद्धतीने मतमोजणी होत होती, तीच पद्धत पुढेही कायम राहील, असे कोर्टाने स्पष्ट केले आहे.

## लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हा -खासदार बारणे

(अधिक छायाचित्र पान ३ वर..)



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या दहा वर्षांपासून मी या मतदारसंघात काम केले आहे. त्यामुळे आपले मत वाया न जाऊ देता लोकशाहीच्या या उत्सवामध्ये सहभागी होऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत काम करण्याची संधी मला पुन्हा एकदा द्यावी, असे आवाहन मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी गुरुवारी (दि.२५) पनवेल कोळीवाड्यात आयोजित प्रचार सभेत केले.

या वेळी भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी, नरेंद्र मोदी हे पुन्हा पंतप्रधान म्हणून पाहिजे असतील, तर श्रीरंग बारणेही पुन्हा खासदार झाले पाहिजे ही आपल्या सर्वांची जिद्द असल्याचे प्रतिपादन करून ते मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास व्यक्त केला. (पान २ वर..)



# देशात एनडीएला वाढत्या पाठिंब्यामुळे विरोधक निराश

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची टीका



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीचे टप्पे जसजसे पुढे सरकत आहेत, तसा प्रचाराला वेग आला आहे. देशभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह सर्व नेते पूर्ण ताकद लावून प्रचार करताना दिसत आहेत. यातच शुक्रवारी (दि.२६) देशात दुसऱ्या टप्प्यातील मतदान झाले. या मतदानाबाबत पंतप्रधान मोदी यांनी समाधान व्यक्त केले आहे.

दुसऱ्या टप्प्यातील मतदान चांगले झाले. दुसऱ्या टप्प्यात मतदान करणाऱ्या संपूर्ण देशभरातील लोकांचे आभार. एनडीएला मिळत असलेला अतुलनीय पाठिंबा विरोधकांची निराशा आणखी वाढवणारा आहे. मतदारांना एनडीएचे सुशासन हवे आहे. युवा आणि महिला मतदार एनडीएच्या भक्कम पाठिंब्याला ताकद देत आहेत, अशी पोस्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर केली आहे.

दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारच्या अररियामध्ये जाहीर सभाही घेतली. या वेळी त्यांनी ईव्हिएम व्हिव्हिपॅटबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावरही भाष्य केले. ते म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या तोंडावर चपराक आहे. हे लोक या व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करीत होते, परंतु सर्वोच्च न्यायालयाने सर्व याचिका फेटाळून लोकशाहीला हानी पोहचवणाऱ्या अशा याचिकांना काही अर्थ नसल्याचे सिद्ध केले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने बॅलेट पेपर आणि मतदान केंद्र लुटणाऱ्या लोकांना मोठा धक्का आहे, अशी टीकाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, केंद्रात तुमचा हा सेवक आणि बिहारमध्ये नितीशजी संपूर्ण ताकदीने काम करीत आहे. राजद आणि काँग्रेसच्या इंडिया आघाडीला ना देशाच्या संविधानाची पर्वा, ना लोकशाहीची. अनेक दशके बॅलेट पेपरच्या बहाण्याने गरिबांचे हक्क हिसकावून घेणारे हेच लोक आहेत. यापूर्वी मतदान केंद्रे आणि बॅलेट पेपर लुटले जायचे. राजद आणि काँग्रेसच्या राजवटीत बॅलेट पेपरची कशी लूट झाली, याची बिहारमधील जनता साक्षीदार आहे.

गोरगरिबांना मतदान करण्यासाठीही घराबाहेर पडू दिले जात नसायचे. त्यांनी सातत्याने लोकशाहीचा विश्वासघात केला. आता आज सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, बॅलेट पेपरचे जुने युग परत येणार नाही, असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले.

# राहुल गांधींना मतदार धडा शिकवतील

## भाजप प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

सोलापूरच्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एकेरी व अवमानकारक उल्लेख करून काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी त्यांची संस्कृती दाखवून दिली आहे. त्यांनी केवळ पंतप्रधान मोदींचा नव्हे, तर देशाच्या सर्वोच्च सांविधानिक पदावरील व्यक्तीचा अपमान केला असून पराभवाच्या भीतीने वैफल्य आल्यामुळे त्यांचा जिभेवरील ताबा सुटल्याचे स्पष्ट झाले आहे. येत्या लोकसभा निवडणुकीत अशा असभ्य व उर्मट नेत्यांना व त्यांच्या पक्षाला जनता त्यांची जागा दाखवून देईल, असे भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी (दि.२६) म्हटले.

भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत उपाध्ये बोलत होते. त्यांच्यासमवेत माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते पंकज मोदी उपस्थित होते.



भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये म्हणाले की, सोलापूरच्या सभेत राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांचा सातत्याने एकेरी उल्लेख केला. त्यांचे हे वक्तव्य आणि वर्तन राजकीय संस्कृतीला शोभणारे नसून केवळ वैफल्य व अपरिपक्वपणा दर्शविणारे आहे. लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला प्रचंड जनाधार मिळत असून ४००पेक्षा अधिक जागांवरील भाजप आघाडीचा विजय निश्चित झाल्याने काँग्रेस व इंडिया आघाडीला वैफल्य आले आहे. राहुल गांधी यांच्या भाषणात याआधीही सुसंस्कृतपणा आणि अभ्यासाचा अभावच होता. आता तर त्यांच्याकडे मुद्दे नाहीत, उमेदवारही नाहीत आणि निवडणूक लढविण्याची उमेदही राहिलेली नाही. त्यातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्याचा पंचनामा करून जनतेची संपत्ती हिरावून घेण्याचा कट उघड केल्यामुळे काँग्रेसची भंबेरी उडाली आहे. जनतेकडील संपत्ती काढून घेण्याचा काँग्रेसचा इरादा त्यांच्या जाहीरनाम्यातूनच उघड झाला असून पंतप्रधान मोदी यांनीच काँग्रेसचा खरा चेहरा जनतेसमोर आणल्याने आता राहुल गांधी यांची पंचाईत झाली आहे.

निवडणुकीतील पराभवाच्या भीतीने राहुल गांधी यांच्या पायाखालची वाळू घसरली होतीच, पण आता जीभही घसरत चालली असून काँग्रेसमुक्त भारताच्या संकल्पास ते स्वतःच हातभार लावत आहेत, अशी खोचक टिप्पणीही उपाध्ये यांनी केली.

# मुंबई किनारी रस्ता आणि वांद्रे-वरळी सागरी सेतूची जोडणी यशस्वी

**मुंबई : प्रतिनिधी**

किनारी रस्ता आणि वांद्रे-वरळी सागरी सेतूला जोडणारा पहिला बो आर्च स्ट्रिंग गर्डर जोडण्यात मुंबई महापालिकेला यश आले. महापालिकेने हाती घेतलेल्या महत्त्वाकांक्षी मुंबई किनारी रस्ता प्रकल्पांतर्गत शुक्रवारी (दि.२६) पहाटे ३.२५ वा. हा गर्डर जोडण्यात आला. या कामाच्या वेळी महापालिका आयुक्त भूषण गगराणी उपस्थित होते.

खुल्या समुद्रात भरती-ओहोटीचा अंदाज घेऊन गर्डरद्वारे या दोन मार्गांना जोडण्याचे नियोजन महापालिकेने हाती घेतले होते. भारतातील हा पहिलाच प्रयोग यशस्वी ठरल्याने महापालिकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. पहाटे २ वाजल्यापासून सुरू झालेले



हे काम पहाटे ३.२५ वा. यशस्वीपणे पार पडले. या ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार होण्यासाठी भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अमित सैनी आणि महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते. या वेळी गगराणी यांनी मुंबई किनारी रस्ता प्रकल्प पथकाचे अभिनंदन केले.

## दुचाकी अपघातात एक ठार, एक जखमी

**महाड** : तालुक्यातील वहूर गाव हद्दीत शुक्रवारी (दि.२६) दुपारी ४ वा. च्या सुमारास दुचाकीला झालेल्या अपघातात एक जण जागीच ठार झाला आहे, तर एक प्रवासी किरकोळ जखमी झाला आहे.

महेंद्र नाकते (३०) आणि दिगंबर नाकते (४०, दोघे रा. डोंबिवली) हे दोघे दुचाकी (एमएच०५ सीडब्लू ७५१६)वरून चिपळूणहून डोंबिवलीला जात असताना चालक महेंद्र नाकते याचा गाडीवरून ताबा सुटला आणि गाडी रस्त्यावर घसरत गेली. मागे बसलेले दिगंबर नाकते हे रस्त्यावर आपटले. डोक्याला जबर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला, तर चालक महेंद्र हे किरकोळ जखमी झाले.

# पंतप्रधान मोदी आज कोल्हापुरात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक आणि हातकणंगलेमधील उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि.२७) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा कोल्हापूरमध्ये आयोजित करण्यात आली आहे. तपोवन मैदानात सायंकाळी ५ वाजता ही सभा होणार आहे. या सभेसाठी महायुतीच्या नेत्यांकडून जोरदार तयारी सुरू आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी ४.३० वा. कोल्हापूर विमानतळावर पोहचतील. सायंकाळी ५ वा. पंतप्रधान मोदी तपोवन या ठिकाणी सभेला उपस्थित राहणार आहेत. यानंतर ते सभेत मार्गदर्शन करतील. सभा पार पडल्यानंतर पंतप्रधान मोदी तपोवन मैदानावरून कोल्हापूर विमानतळाकडे रवाना होतील. त्यानंतर कोल्हापुरातून मुंबईकडे रवाना होणार आहेत.

दरम्यान, पंतप्रधानांच्या सुरक्षेच्या कारणास्तव विमानतळापासून ते तपोवन मैदानापर्यंत पोलिसांची करडी नजर राहणार आहे. यासाठी केंद्रीय राखीव सुरक्षा दलाच्या जवानांसह, राज्य राखीव पोलीस, जिल्हा पोलीस, होमगार्ड तैनात केले जात आहेत.

## कराड, पुणे दौराही निश्चित

***पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. २८) सकाळी महायुतीचे उमेदवार भाजपचे उदयनराजे भोसले यांच्या प्रचारार्थ कराड येथे जाहीर सभा होणार आहे. त्यानंतर हेलिकॉप्टरने ते पुण्यात दाखल होणार आहेत. महायुतीचे उमेदवार भाजपचे मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ रेसकोर्स येथील मैदानात जाहीर सभा होणार आहे. त्यानंतर पंतप्रधान मोदी यांची शहरात वाहनातून प्रचारफेरी (रोड शो) होणार आहे, तर मंगळवारी (दि.२९)सकाळी पंतप्रधान मोदी हे सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे रवाना होणार आहेत.***

पान १ वरून



## पेणचा पाणी प्रश्न मार्गी लागणार

आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार महेश बालदी, आमदार अनिकेत तटकरे, माजी आमदार धैर्यशिल पाटील, भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, सरचिटणीस विक्रांत पाटील, जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, सरचिटणीस महेश मोहिते, मिलिंद पाटील, जि.प.च्या माजी अध्यक्ष नीलिमा पाटील, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दयानंद भगत, शहर अध्यक्ष जितेंद्र पाटील, मनसेचे जितेंद्र पाटील, शिवसेनेचे शहरप्रमुख दिनेश पाटील, महेश पोरे आदी उपस्थित होते. त्याचप्रमाणे सभेला पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या भाषणात म्हणाले की, एकीकडे विश्वगौरव, विकासपुरुष नरेंद्र मोदी व त्यांच्या मार्गदर्शनाखाली असलेली महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वखालील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रासप, आरपीआय, पीआरपी, मनसेची महायुती, तर दुसरीकडे राहुल गांधींची २६ पक्षांची खिचडी आहे. महायुतीला मोदीसाहेबांचे इंजिन आहे. हे केवळ देशातच नव्हे; तर जगात शक्तिशाली इंजिन आहे. या इंजिनाला घटक पक्षांचे डब्बे असून यामध्ये दीन, दलित, गरीब, भटक्या विमुक्त जाती-जमाती, शेतकरी, आदिवासी या सर्वांना बसण्याची जागा असून ही विकासाची गाडी आहे. या गाडीमध्ये सर्वांना बसवून सबका साथ, सबका विकास करीत गाडी पुढे जात आहे. ज्या क्षणी तुम्ही सुनील तटकरे यांना मत देता तेव्हा या इंजिनाला रायगडच्या विकासाचा डब्बा जोडला जाईल. विरोधी पक्षाकडे एकच इंजिन असून त्यांच्याकडे डब्बे राहिले नाहीत, मात्र या इंजिनामध्ये त्यांच्याच नातेवाईकांना जागा आहे. इंडिया आघाडीतील प्रत्येक पक्ष आपापले प्रभूत्व सिद्ध करण्याच्या मागे असून यामुळे त्यांचे इंजिन बंद पडले आहे. अशावेळी देशाला एकच पर्याय आहे तो म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी, ज्यांनी या देशाला विकासाकडे नेले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वखालील सरकारने विविध लोकोपयोगी योजना आणल्या असून १० वर्षांत देशातील २५ कोटी लोक गरिबी रेषेच्या वर आले आहेत. २० कोटी लोक जे झोपडीत राहत होते त्यांना पक्की घरे मिळाली. ५० कोटी घरांमध्ये गॅस पोहचविला गेला. ५५ कोटी लोकांसाठी शौचालयाची व्यवस्था करण्यात आली. ६० कोटी लोकांच्या घरी शुद्ध पाणी पोहचवले. ५५ कोटी लोकांना पाच लाख रुपयांपर्यंतचा इलाज आयुष्यमान भारत योजनेच्या माध्यमातून मोफत देण्यात आला. ६० कोटी तरुणांना १० लाखांपर्यंतचे मुद्रा लोन विना तारण आणि विना गॅरेंटर दिले. यामध्ये ३१ कोटी महिला आहेत. ८० लाख बचत गटांना आठ लाख कोटी रुपये देऊन महिलांना आपल्या पायावर उभे केले. विमानतळ, रेल्वे स्टेशन, बसस्थानक, सरकारी जागा अशा अनेक ठिकाणी महिला बचत गटांना स्टॉलसाठी जागा उपलब्ध करून देण्याचे काम केले आहे. २०२६नंतर महिलांना लोकसभा आणि विधानसभेत ३३ टक्के महिलांना प्रतिनिधित्व मोदीजींमुळे मिळणार आहे. कारागिरांसाठी विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून १४ हजार कोटी रुपये देऊन पारंपरिक व्यवसायात आधुनिकता आणण्याचे काम मोदीजींनी केले. आदिवासी समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी २५ हजार कोटी रुपयांची योजना आणून गाव, खेडी, वाड्या, पाड्या, वस्त्यांवर रस्ते, वीज, पाणी, शिक्षण या सुविधा पोहचविण्याचे काम मोदी सरकारने केले. आता तर मोदीजींनी प्रधानमंत्री सूर्य घर योजना आणली असून या योजनेमुळे ३०० युनिट मोफत विजेचा लाभ ग्राहकांना मिळणार आहे. त्यांनी किसान सन्मान योजना आणली. राज्य सरकारनेही शेतकऱ्यांसाठी योजना आणली. मासेमारी करणाऱ्यांसाठी मोदी सरकारने मंत्रालय सुरू करून नीलक्रांती योजना आणली. यातून कोळी बांधवांना मदत करण्याचे काम होत आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

जगातील सगळ्यात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था भारताची असल्याचा निर्वाळा इंटरनॅशनल वॉलेंट्री फंडाने दिला आहे. गेल्या १० वर्षांत देशाची अर्थव्यवस्था ११ क्रमांकावरून पाचवर आणण्याचे काम मोदी सरकारने केले. भविष्यात ती तिसऱ्या स्थानी येणार आहे. अर्थव्यवस्था निर्माण होताना रोजगार निर्मिती, बंदरे विकसित होतात, रस्ते-महामार्ग विस्तार होतो, हवाई वाहतूक विस्तार होतो, गरिबांना वेगवेगळ्या प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध होतात. रस्त्याचे जाळे निर्माण करण्याचे काम होत असून अशी अनेक कामे मोदीजींच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहेत. कोरोना काळात देशाला सावरण्याचे काम मोदीजींनी केले. स्वदेशी लस निर्माण करून १४० कोटी जनतेपर्यंत लस पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

मागच्या वेळी भाजपच्या मतांवर निवडून आलेले अनंत गीते आता भाजपवर टीका-टिपण्णी करीत आहेत, परंतु हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर चालणारी खरी शिवसेना आमच्यासोबत आहे. ज्यांनी बाळासाहेबांचा विचार सोडला, त्यांच्याबरोबर जनता जाणार नाही हे लक्षात ठेवा, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

आमदार रविशेठ पाटील आणि माजी आमदार धैर्यशील पाटील यांची दोस्ती पाहून आम्ही अचंबित झालो आहोत. आगामी काळात हे दोन्ही नेते योग्य ठिकाणी दिसतील, असा शब्द या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी पेणच्या जनतेला दिला. देशात पुन्हा मोदीजींना संधी देण्यासाठी रायगडमधून सुनील तटकरे यांना विजयी करा, असे आवाहनही त्यांनी केले.

या वेळी मंत्री उदय सामंत, रवींद्र चव्हाण, खासदार सुनील तटकरे, आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील आदींचीही भाषणे झाली.

## लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हा -खासदार बारणे


भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, आरपीआय, पीआरपी, रासप आणि मित्रपक्षांच्या महायुतीचे मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा मतदारसंघात जोरदार प्रचार सुरू आहे. या अनुषंगाने पनवेल ग्रामीण भागात गुरुवारी झालेल्या प्रचार दौऱ्याला व चौकसभांना मतदार, नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. या दिवसभराच्या प्रचाराची सांगता पनवेल कोळीवाड्यातील सभेने झाली. या सभेवेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी कोळी लोकांची शान असलेली लाल गोंड्याची टोपी परिधान केली होती. कोळी समाजाच्या वतीने या सर्व मान्यवरांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

दरम्यान, मान्यवर पनवेल शहरात दाखल होताना भव्य बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीत महायुतीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी केलेल्या घोषणांमुळे परिसर दणाणून गेला होता. बाईक रॅलीला गार्डन हॉटेलपासून सुरुवात झाली व सांगता पनवेल कोळीवाड्यात झाली. रॅलीदरम्यान खासदार श्रीरंग बारणे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यांना अभिवादन केले. मान्यवर उरण नाक्याजवळील सभेच्या ठिकाणी पोहचले असता त्यांचे ढोल ताशाच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आले.

या सभेला भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, राष्ट्रवादीचे प्रदेश चिटणीस शिवदास कांबळे, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, मुकीत काझी, समीर ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, अ‍ॅड. वृषाली वाघमारे, नीता माळी, महिला मोर्चा शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, भाजप नेते संजय जैन, संजय भगत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, हारू भगत, राजेश पाटील, विराज गायकवाड, प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, केदार भगत, मयुरेश खिस्मतराव यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी खासदार श्रीरंग बारणे यांनी भाषणात म्हटले की, देशभरात सुरू असलेल्या विकासकामांना गती देण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी करीत आहेत. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आणि आमदार प्रशांत ठाकूर हे पनवेल विधानसभा मतदारसंघामध्ये पुढाकार घेत प्रकल्पग्रस्तांसह नागरिकांना न्याय देण्याचे काम करीत आहेत. आम्ही निवडणुकीच्या माध्यमातून केवळ घोषणा देण्याचे नाही, तर प्रत्यक्षात काम करीत आहोत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकालाही माहीत आहे की, यंदाही मोदींजीचेच सरकार येणार आहे. देशातील विरोधी पक्षांकडे पंतप्रधानपदाचा उमेदवार नाही, चेहरा नाही आणि त्यांचे कामही नाही. त्यामुळे आपले मत वाया घालवू नका. आपल्यासमोरील उमेदवार अपरिचित आहेत. मी नऊ निवडणुका लढलो असून गेल्या तीस वर्षांत माणसे जोडण्याचे काम केले तसेच खासदार म्हणून गेली दहा वर्षे मतदारसंघामध्ये काम करून मतदारांनी माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ केला आहे. त्यामुळे या लोकशाहीच्या उत्सवामध्ये सहभागी होत १३ मे रोजी धनुष्यबाणासमोरील बटन दाबून पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत काम करण्याची संधी द्यावी. मी भविष्यकार नाही, पण प्रचंड मताधिक्क्याने निवडून येणार हा विश्वास आहे.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, देशाला दिवसरात्र न थकता काम करणारा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रूपात लाभलेला आहे. नागरिकांनीही आपल्या मनात नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होणार याची खूणगाठ बांधलेली आहे. त्यामुळे मतदारांना फक्त मतपेटीपर्यंत न्यायचे आहे. खासदार असावा तर श्रीरंग आप्पा बारणेंसारखा याचा आपल्याला अभिमान वाटेल असे काम त्यांनी केले आहे. सर्वांना पाठबळ देण्याचे काम ते करीत असून केंद्रासह राज्य सरकाचा निधी जास्तीत जास्त विकासकामांसाठी कसा मिळेल यासाठी मेहनत घेत आहेत. आपल्या परिसरात होणारा विकास हा कायम होताना पहायचा असेल, तर पुढची पाच वर्षे नरेंद्र मोदींना पुन्हा पंतप्रधान आणि श्रीरंग बारणे यांना पुन्हा खासदार करावे लागेल. त्यासाठी प्रत्येक मतदारापर्यंत पोहचा. सर्वांनी मिळून प्रचार करा. देशात गेल्या दहा वर्षांत जो विकास झाला तो फक्त ट्रेलर होता. खरा विकास हा येणाऱ्या काळात आपल्याला पहायला मिळणार आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींना विजयी करण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांना विजयी करा.



# ट्रेडींगच्या नफ्याचा बहाणा करून गंडा

## खांदेश्वर वसाहतीमधील एका व्यक्तीची लाखोंची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**




सोशल मिडीयाच्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक करण्याच्या प्रकारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यात सोशल मिडीयावरील फसव्या आमिषाला बळी पडून नागरिकांवर आपल्याकडील मौल्यवान ऐवज व रोकड गमावल्यानंतर डोक्यावर हात देण्याची वेळ येते. अशाचप्रकारची घटना खांदेश्वर वसाहतीमधील एका व्यक्तीसोबत घडली आहे.

शेअरट्रेडींगमध्ये आमची कंपनी अधिकचा नफा मिळवून देईल असे आमिष दाखवून खांदेश्वर वसाहतीमध्ये राहणाऱ्या ४४ वर्षीय व्यक्तीला साडेबावीस लाखांना फसविण्यात आले आहे. या ऑनलाईन फसवणूकीच्या गुन्ह्यात पोलीस भामट्यांचा शोध घेत आहेत. या प्रकरणात भामट्याने साडेअठरा लाख रुपये ऑनलाईन बँक खात्यावर वळते करून आणि चार लाख रोख रक्कम स्विकारुन ही फसवणूक केली आहे.

नवी मुंबई पोलीस दलाकडून ऑनलाईन शेअर ट्रेडींगचे व्यवहार करताना गुंतवणूकदारांनी जागरुकपणे ज्या गुंतवणूकदार कंपनीमध्ये लाखो रुपयांची गुंतवणूक करतोय त्याची खात्री करण्याचा सल्ला दिला आहे, मात्र सूशिक्षित वर्गाकडून नवीन गुंतवणूक करताना कंपन्यांची माहिती घेतल्याशिवाय व्यवहार केल्याने मोठ्या प्रमाणात सूशिक्षितांची फसवणूक होत असल्याचे समोर आले आहे. खांदेश्वर वसाहतीमधील ४४ वर्षीय व्यक्तीला ऑनलाईन ट्रेडींग कंपनीच्या नावाने फोनवर संपर्क साधला गेला. त्यांची फसवणूक करण्यासाठी भामट्यांनी दोन वेगवेगळे मोबाईलनंबर वापरले.

मोबाईलवरील व्हॉट्सअॅपवरुन अयान अन्सारी व अहमद या दोन व्यक्तींनी त्यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांचा विश्वास संपादनासाठी इंडीयन डीमॅट खाते असल्याचे सांगण्यात आले.

सध्या मिळत असलेल्या नफ्यापेक्षा अधिक नफा अल्ट्रा ग्लोबल मार्केट या कंपनीत पैसे गुंतविल्यास नफा मिळेल असे सांगून त्यांची साडेअठरा लाख रुपये भरायला सांगीतले. व त्यानंतर पुन्हा वेगवगेळ्या कारणांद्वारे पैसे मागून साडे बावीस लाखांची फसवणूक केली.

दरम्यान, फसवणूक करण्यासाठी नाना बहाण्यांचा वापर संबंधित व्यक्तीकडून केला जातो. त्या आमिषामुळेच समोरील व्यक्तीला फसवणूक झाल्यावर पश्चाताप करण्याची वेळ येते.

# लोकसभा निवडणुकीत पोलिसांकडून ऑपरेशन ऑल आऊटमार्फत कारवाया

**पनवेल : वार्ताहर**



लोकसभा निवडणुका शांततेने पार पाडाव्यात, यासाठी पनवेल परिमंडळ २मधील पोलिसांनी तयारी सुरू केली आहे. मागील काही दिवसांत राबविण्यात आलेल्या ऑपरेशन ऑल आऊट अंतर्गत १० पोलीस ठाण्यांमार्फत विविध कारवाया करण्यात आल्या आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या पनवेल परिमंडळ २ अंतर्गत पनवेल शहर, पनवेल तालुका, खांदेश्वर कामोठे. कळंबोली, तळोजा, खारघर, न्हावाशेवा, उरण आणि मोरा सागली ही पोलीस ठाणी आहेत. रायगड जिल्ह्यातील पनवेल आणि उरण तालुक्यांतील सर्व पोलिस ठाण्याअंतर्गत ही मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत एक हजार ४४८ संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली. यापैकी तब्बल ३४८ वाहनांवर कारवाया करण्यात आल्या. सर्व पोलीस ठाण्यांत नोंद असलेल्या, सातत्याने गुन्हेगारीत अडकलेल्या, फसवणूक करणाऱ्या आरोपींची तपासणी करून ६३ जणांची माहिती तपासण्यात आली. आठ जणांवर बेकायदा विनापरवाना हत्यार बाळगल्याप्रकरणी कारवाई करण्यात आली. ३१ ठिकाणी अवैध दारूविक्री करणाऱ्या, दारूची वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली.

विविध न्यायप्रविष्ट गुन्ह्यांतील साक्षीदार, आरोपींना १५९ समन्स आणि ६० वॉरंट बजावण्यात आले. रेकॉर्डवरील ११८ आरोपींना पोलीस ठाण्यात बोलावून ताकीद देण्यात आली.

## निवडक

### डंपरची एसटीला धडक; वाहनांचे नुकसान

**पनवेल :** एका डंपरने एसटी बसला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. पनवेलजवळील उरण-पनवेल जुन्या रोडने गव्हाण फाटा ते पाडेघरच्या रस्त्यावर एका डंपरवरील चालक कच्च्या रस्त्याने मुख्य रस्त्यावर त्याच्या ताब्यातील डंपर घेऊन येत होता. तेव्हा त्याची एसटी बसला डाव्या बाजूने समोर ठोकर बसली. झालेल्या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### दोन दुचाकींची धडक; दोघे जखमी

**पनवेल :** मुंबई-पुणे जुन्या हायवेवरून शिव शंभो नाक्यावरून डाव्या बाजूने पनवेलमध्ये जाणाऱ्या रस्त्यावर पंचरत्न चौकात एका स्कुटी गाडीवरील चालकाची मोटरसायकलीस धडक बसली. झालेल्या अपघातात मोटार सायकलींवरील दोघेजण जहकही झाल्याची घटना घडली आहे. स्कुटी गाडी वरून वरील ठिकाणावरून चाललेल्या चालकाने त्याच्या पुढे चाललेल्या मोटरसायकलीस पाठीमागून ठोकर बसली. अपघातात मोटरसायकवर असलेले रोमियो पॅट्रिक डेव्हिड (वय २९) व शैल्डेन वेगस (वय २३) हे दोघेजण जखमी झाले आहेत. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# खारघर येथे अपघातात कुटुंबातील तिघे जखमी




**पनवेल : वार्ताहर**

शीव-पनवेल महामार्गालगत अवजड वाहने उभी करण्याचे प्रमाण वाढल्याने मोटरचालकाच्या एका चुकीमुळे प्रवाशांना अपघाताला सामोरे जावे लागते. ही एक घटना खारघर येथे घडली असून याबाबत कामोठे येथे राहणाऱ्या एका कुटुंबातील तिघांना चालकाच्या चुकीमुळे अपघाताला सामोरे जावे लागले.

कौस्तुभ नावगे व त्यांचे कुटुंबीयांना वांद्रे ते कामोठे या दरम्यान प्रवास करताना मोटारचालकाच्या चुकीमुळे अपघात झाला. त्यामुळे प्रवाशांनी मोटरचालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे. २० वर्षीय कौस्तुभ नावगे हे कुटुंबाला घेऊन जात होते. चालक वासीम अहमद हा मोटार चालवीत होता. वासीम चालवीत असलेली मोटार सीबीडी उड्डाणपुलापुढील बेलपाडा गावानजीक शीव-पनवेल महामार्गापर्यंत आल्यावर त्याला महामार्गाशेजारी उभा असणारा ट्रक दिसला नाही. त्याने मागून ट्रकला धडक दिली.

या अपघातामध्ये नावगे यांच्या वडिलांच्या मानेला जबर दुखापत झाली तसेच आई व बहिणीला दुखापत झाली. कौस्तुभ याने याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात मोटारचालक वासीम यांच्याविरोधात गुन्हा नोंदविला आहे.

# उरण-पनवेल मार्गावरील हाईट गेट हटविण्याची मागणी



**उरण : प्रतिनिधी**

सिडकोने उरण-पनवेल मार्गावरील नादुरुस्त खाडीपुलाच्या दुरुतीचे काम एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण झाले आहे, मात्र खाडीपूल कमकुवत असल्याने वाहतूक विभागाने या मार्गावरील अवजड व प्रवासी वाहतूक बंद केली आहे. यासाठी सिडकोच्या द्रोणागिरी नोड अधिकाऱ्यांनी वाहतूक विभागाला पत्र पाठवून हाईट गेट खुले करण्याची मागणी केली आहे.

२०२१पासून उरण पनवेल मार्गावरील खाडीपुल नादुरुस्त झाला आहे. त्यामुळे येथील बोकडविरा, फुंडे, डोंगरी व पाणजे या चार गावातील हजारो नागरिकांना अजून प्रतीक्षा करावी लागणार आहे. उरण -पनवेल मुख्य मार्गावरील हा खाडीपूल कमकुवत असल्याने या मार्गावरील एसटी व एनएमएमटी बस वाहतूक बंद करण्यात आली आहे.

खाडीपूल त्वरित दुरुस्त करावा या मागणीसाठी ऑक्टोबर २०२३मध्ये जनवादी महिला संघटनेने सिडको कार्यालयावर आंदोलन केले होते. त्यावेळी सिडकोचे अधिक्षक अभियंता श्रीकांत गोसावी यांनी जानेवारी २०२४ पर्यंत पुलाची दुरुस्ती करून प्रवासी वाहनांसाठी खुला करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र पुलाचे काम पूर्ण होण्यास एप्रिल महिना उजाडला आहे. मार्गावरील हाईट गेटमुळे झालेल्या अपघातात अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. मंगळवारी आणखी एका टेम्पोचा अपघात झाला आहे.

या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण करणारे हाईट गेट हटवा तसेच एसटी व एनएमएमटी सारखी प्रवासी वाहने सुरू करून बोकडविरा, फुंडे, डोंगरी व पाणजे या गावातील विद्यार्थी आणि कामगारांना आर्थिक भुर्दंड सहन करावा आहे. त्यापासून दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिक करीत आहेत.






**पनवेल : गव्हाण, कोपर, शिवाजीनगर आणि शेलघर या गावांच्या मध्यभागी श्री शांतादेवीचे पुरातन काळापासून मंदिर आहे. पूर्वीपासून गव्हाण गावाची जत्रा केवळ रायगड जिल्ह्यातच नव्हे तर ठाणे जिल्ह्यातही प्रसिद्ध आहे. या यात्रेचे औचित्य साधून गेली १९ वर्ष मंदिरासमोर अखंड हरिनाम सप्ताह आयोजन करण्यात येते. या सप्ताहाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत मनोभावे दर्शन घेतले. या वेळी ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, हभप वसंतशेठ पाटील, सुधीर ठाकूर, जयवंत देशमुख, किशोर पाटील, सुधीर घरत, ग्रामपंचायत सदस्य कामिनी कोळी, उषा देशमुख, अनुसया घरत, अशोक कडू, अमृत भगत, अजय भगत, सुहास भगत, अशोक कडू यांच्यासह भाविक उपस्थित होते.**




**पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रचारार्थ पनवेल परिसरात भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी घरोघरी प्रचार केला.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात जागतिक वसुंधरा दिन साजरा

**खारघर : रामप्रहर वृत्त**




जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि. २२) सकाळी ११ वाजता वनस्पती शास्त्र विभाग व नेचर्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक वसुंधरा दिनानिमित्त महाविद्यालयाच्या आवारामध्ये वेगवेगळ्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

हा पर्यावरणीय उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या उपक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्राध्यापक व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला. या उपक्रमाचे आयोजन प्रा. पूजा लांजेकर वनस्पतीशास्त्र विभाग यांनी केले तसेच प्रा. शिल्पा पाटील, प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. राहुल कांबळे प्रा. मनोज यादव, प्रा. दिपाली लावंड, प्रा. डॉ. महादेव चव्हाण व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सत्कार केले.

# शिवसेना उरण विधानसभा संपर्कप्रमुखपदी रमेश म्हात्रे

**उरण : वार्ताहर**



शिवसेनाच्या उरण पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या नुकत्याच करण्यात आल्या. त्यामध्ये उरण विधानसभा संपर्कप्रमुखपदी रमेश म्हात्रे यांची नियुक्ती करण्यात आली. उपजिल्हा संघटकपदी रवींद्र गायकवाड, तालुका संघटकपदी चंद्रकांत पाटील, उप तालुकाप्रमुखपदी नंदकुमार म्हात्रे यांनी निवड करण्यात आली.

शिवसेनेची उरणमधील अनेकपदे रिक्त होती. रिक्त असलेले पद नित्तीच भरण्यात आली. जिल्हाप्रमुख संतोष भोईर यांनी नुकतीच नवीन पदाधिकारी यांना नियुक्तीपत्र दिले.

## पनवेल इंडस्ट्रीयल परिसरात घरफोडी

**पनवेल :** पनवेल जवळील पनवेल इंडस्ट्रीयल को ऑ. इस्टेट लिमीटेड परिसरात दोन ठिकाणी अज्ञात चोरट्याने केलेल्या घरफोडीत लाखो रुपये किमतीचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. येथील हॉलमार्क मोटर लिंकस् एल.एल.पी., (रॉयल इनफील्ड), प्लॉट नंबर १०१. पनवेल इंडस्ट्रीयल को ऑ. इस्टेट लिमीटेड या ठिकाणच्या शोरुमच्या मागील जीन्याचे दरवाजाने अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करुन लिनोव्हा कंपनीया लॅपटॉप, नोकीया कंपनीचा मोबाईल फोन, जीवो कंपनीचा मोबाईल फोन व रोख रक्कम असा मिळून एकुण एक लाख ८१ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला आहे. दुसऱ्या घटनेत विशाल हुडाई वर्कशॉपमध्ये चोरी करून त्या ठिकाणाहून दोन हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली आहे. या घटनेची निंद्य पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.




**पनवेल : तालुक्यातील न्हावा गावच्या यात्रेनिमित्त माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत यांनी भेट देत गावदेवीचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजप महिला गाव अध्यक्ष मीनाक्षी पाटील, कोमल विजेंद्र पाटील, नंदा ठाकूर उपस्थित होत्या.**

## संपादकीय

# पराभवाआधीचा मुखभंग

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदान होतानाच सर्वोच्च न्यायालयाने विरोधकांच्या ईव्हीएम अर्थात मतदानयंत्रांसंदर्भातील शहाजोग अडाणीपणाला सणसणीत चपराक दिली हे बरे झाले. इथून पुढे तरी ही उथळ चर्चा थांबायला हवी.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील दहा वर्षांच्या राजवटीने भारतीय मतदारांना सर्वांत मोठी भेट दिली ती विश्वासार्हतेची. खुद्द पंतप्रधान मोदी यांच्यावर भारतीय जनतेचा प्रचंड विश्वास आहे आणि त्यांचीच राजवट भारताला विकासाच्या मार्गावर पुढे नेईल याची सर्वांना खात्रीही वाटते. अर्थात अपवाद आहे तो फक्त त्यांच्या विरोधकांचा. मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून विरोधकांनी मतदानयंत्रापासून बहुतेक सर्वच सरकारी यंत्रणांवर अविश्वास दाखवला आहे. मतदानयंत्रांचा वापर हा काही मोदी राजवटीत सुरू झालेला नाही. मतदानयंत्रांचा वापर अत्यंत पारदर्शी आणि सुविहितपणाने करणाऱ्या निवडणूक कर्मचाऱ्यांना खरे तर शाबासकी द्यायला हवी, परंतु मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्ष वारंवार विजयी ठरू लागल्यानंतर विरोधकांच्या पायाखालची जमीन सरकली. यातूनच लोकसभा निवडणुकीच्या ऐन तोंडावर निवडणूक यंत्रणेवर आक्षेप घेणाऱ्या अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात केल्या गेल्या. यासंदर्भात शुक्रवारी निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएम-व्हीव्हीपॅट पडताळणीची मागणी करणाऱ्या सर्व याचिका फेटाळून लावल्या. तसेच मतपत्रिका अर्थात बॅलट पेपरच्या मागणीसंदर्भात दाखल करण्यात आलेल्या याचिकाही रद्द केल्या. देशात मतदान ईव्हीएम मशीनद्वारेच होईल तसेच ईव्हीएममधील मतांची आकडेवारी आणि व्हीव्हीपॅटमधील पावत्या १०० टक्के मोजल्या जाणार नाहीत असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. व्हीव्हीपॅटच्या पावत्यांची मोजणी करून त्या ईव्हीएममधील मतांच्या आकडेवारीशी १०० टक्के जुळल्या पाहिजेत, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली होती. आपल्या मतदारसंघातील निकालाबद्दल काहीही तक्रार असल्यास निकालानंतर सात दिवसांच्या आत कोणताही उमेदवार ईव्हीएमच्या मायक्रो-कंट्रोलरच्या पडताळणीसाठी शुल्क भरून फेरमोजणीची मागणी करू शकतो. याखेरीज निवडणुकीनंतर निवडणूक चिन्ह लोडिंगचे युनिट सील करून सुरक्षित ठेवण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटमध्ये कोणत्याही प्रकारची छेडछाड करणे शक्य नाही अशी भूमिका सुनावणीदरम्यान निवडणूक आयोगाने घेतली तर याचिकाकर्त्यांचे वकील प्रशांत भूषण हे अखेरपर्यंत मशीनमध्ये छेडछाड होण्याच्या शक्यतेबद्दल बोलत राहिले. पुरावे नसताना निव्वळ संशयाच्या बळावर सर्वोच्च न्यायालय ईव्हीएमच्या विरोधात आदेश द्यायचे का, असा प्रश्न करीत न्यायालयाने त्यांना खडसावले. भाजपचा विजय केवळ इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रांच्या छेडछाडीतून होतो आहे असा आरोप प्रत्येक निवडणुकीच्या वेळी करणारे विरोधक एखाद्या निवडणुकीत त्यांच्या हाती यश लागल्यावर मात्र त्याविरोधात अवाक्षर काढत नाहीत. गेली काही वर्षे ईव्हीएमविरोधातील ही ओरड बरीच वाढली होती व परिणामस्वरुपी यंदाच्या लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यासंदर्भातील अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या. यापूर्वीही अनेकदा सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमविरोधातील याचिकांचा विचार केला आहे. आश्चर्य याचे वाटते की चांगली सुशिक्षित माणसेदेखील मतदानयंत्रातील तथाकथित हेराफेरीबाबत शंका बाळगताना दिसतात. हा शुद्ध अडाणीपणा आहे हे त्यांना कळत नाही. मतदानयंत्राबद्दल शंका घेणारे जीपे, पेटीएम असे पेमेंट गेटवेज मात्र सर्रास वापरतात. मोबाइल फोनमध्ये दूरस्थ पद्धतीने हेराफेरी करता येते. तसे काही मतदानयंत्राबाबत संभवतच नाही. तरीही असल्या शंकाकुशंकांना पद्धतशीर खतपाणी घातले जाते हे दुर्दैवी आहे.**

# कोळी समाजातील लग्नसराई आणि वरमाई परंपरा

सध्या लग्नसराईचा हंगाम आहे. त्यामुळे प्रत्येक समाजातील लग्नात केल्या जाणाऱ्या प्रथा परंपरा ह्या वेगळ्या असतात. त्यांना खास असा इतिहास किंवा कथा असते. त्यातीलच कोळी समाजात लग्नसराईत आवर्जुन होणार वरमाई प्रथेची माहिती या लेखात आज पाहुयात...

कोळी समाजात विविध सण, उत्सव, प्रथा मोठ्या आनंदाने जपल्या जातात. त्यातलीच माहेरवाशिणीचा मान करणारी व तिला लक्ष्मी स्वरूप समजणारी प्रथा म्हणजे वरमाई प्रथा आहे. ही प्रथा आजही उरणसह पनवेल, नवी मुंबईतील कोळीवाड्यात पारंपरिकरीत्या पाळली जाते. सध्या लग्नसराईचा हंगाम असल्यामुळे ही परंपरा गावोगावी दिसून येत आहे.



वरमाय (वरमाई) म्हणजे वराची आई. कोळी समाजात आईला लक्ष्मीच स्वरूप मानून पारंपरिक कोळी पद्धतीने तिला सजवून तिचा मानपान करून तिला सन्मान दिला जातो. कोळी समाजात पहिल्या किंवा शेवटच्या मुलाचे लग्न असेल त्या वेळी हळदीच्या आदल्या दिवशी नवरदेवाच्या आईला तिचे भाऊ म्हणजे नवरदेवाचे मामा, तिचे हात धरून माहेरी आणतात. या प्रथेला वारणीत असेही म्हणतात. वारणीत म्हणजे माहेरची लेक. ही लेक माहेरी आली की तिची प्रथम दृष्ट काढली जाते व घरासमोर कणारूपी रांगोळी काढली जाते. या कणारूपी रांगोळीवर पाट, चौरंग किंवा खुर्ची ठेवून वरमाईला माहेरच्या अंगणात अंघोळ घातली जाते. अंघोळ घालताना कोळी समाजाची पारंपरिक गाणी म्हटली जातात व या वेळी वरमाईला हळददेखील लावली जाते. वरमाईला हळद लावण्याचा मान हा तिच्या वहिनीचा असतो म्हणजे नवरदेवाच्या मामीचा असतो. त्यानंतर माहेरच्या महिला तिला माहेरची साडी नेसवून, कोळी पद्धतीचे दागिने घालून पारंपरिक पद्धतीने सजवतात.

### पिवळ्या रंगाचीच साडी

वरमाईला देवी महालक्ष्मीचे प्रतीक म्हणून शेंद्री व पिवळ्या रंगाचीच साडी नेसवली जाते. कोळी पद्धतीचे पारंपरिक दागिने म्हणजे गळ्यातली कंठी डोरलं, कोळी गाठलं (कोळी पद्धतीचे मंगळसूत्र) हिरवा चुडा, सोन्याच्या पाटल्या, कानातले काप असा कोळी दागिन्यांचा ऐवज घातला जातो. वरमाईची ओटी भरली जाते. भाऊ बहिणीला गोड पदार्थ भरवतो व बहिणीच्या पाया पडतो. माहेरील मंडळी या वरमाईला भेट म्हणून साडी व पैसे देतात.

### वाजत-गाजत सासरी पाठवणी

ज्याप्रमाणे एका नववधूची माहेरून सासरी पाठवणी केली जाते, त्याच पद्धतीने हा विधी केला जातो. नववधू जशी माहेरहून सासरी जाते तेव्हा मागे आपल्या मागे तांदूळ उडवते. त्याच पद्धतीने ही वरमाईदेखील माहेरच्या घरात तांदूळ मागे उडवत जाते. वरमाई जेव्हा माहेरून सासरी जायला निघते तेव्हा घरातील काकी, वहिनी या स्वतःच्या साडीचा पदर खाली ठेवून वरमाईला त्या पदरावरून चालायला लावतात व भाऊ, बहिणीची पादत्राणे हातात घेऊन तिच्या पायात घालतात. त्यानंतर भाऊ राखणदार म्हणून मागे छत्री धरून बहिणीच्या मागे उभा राहतो. त्यानंतर या वरमाईची वाजत गाजत माहेरहून थेट सासरी मिरवणूक काढली जाते.

### स्त्रीशक्तिला खूप महत्त्व

वरमाई सासरी पोहचवल्यानंतर वरमाईच्या जावा म्हणजे नवरदेवाच्या काकी वरमाईची आरती करतात व नारळ फोडून घरात घेतात. वरमाई जेव्हा घरात माहेरून सासरी येते त्यानंतरच वरमाईचा मुलगा नवरदेव हा घोड्यावर बसून बाहेर जाऊ शकतो. कोळी समाजात स्त्रीशक्तिला खूप महत्त्व दिले जाते. त्यामुळेच वरमाई प्रथेचा आनंद सोहळा साजरा केला जातो. **(साभार : इंटरनेट)**

# बॉलीवूड अभिनेते विनोद खन्ना

हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते विनोद खन्ना यांचा जन्म ६ ऑक्टोबर १९४६ रोजी पेशावर (पाकिस्तान) येथे झाला. भारताची फाळणी झाल्यानंतर त्यांचे कुटुंब मुंबईमध्ये आले. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

विनोद खन्ना यांचे सुरुवातीचे शिक्षण मुंबईतील सेंटमेरी स्कूलमध्ये झाले. १९६०नंतर पुढील शिक्षण नाशिकमधील बर्नेस स्कूल या निवासी शाळेमध्ये झाले. मुंबईतील सिडनहम कॉलेजमधून त्यांनी पदवी घेतली. शालेय वयात अभिनयाशी संबंधित केलेल्या कार्यक्रमांमुळे त्यांना पुढे अभिनयाची आवड निर्माण झाली; पण याच क्षेत्रात काम करण्यासाठी त्यांच्या घरून त्यांना विरोध होता.

प्रसिद्ध अभिनेते सुनील दत्त यांच्या मन का मीत (१९६८) या चित्रपटामधून विनोद खन्ना यांना पहिल्यांदा संधी मिळाली. यात त्यांनी खलनायकाची भूमिका साकारली. त्यांच्या सुरुवातीच्या पूरब और पश्चिम, सच्चा झुठा, आन मिलो सजना, मस्ताना, ऐलान इत्यादी चित्रपटांमधून त्यांनी खलनायकाच्या भूमिका साकारल्या. हम तुम और वो (१९७१) हा नायक म्हणून त्यांचा पहिला चित्रपट होता. त्यानंतर गुलजार यांची कथा, पटकथा आणि दिग्दर्शन असलेला मेरे अपने (१९७१) हा बंगाली आपनजन याचा हिंदीमध्ये रूपांतर केलेला चित्रपट विनोद खन्नांसाठी महत्त्वाचा ठरला. यामध्ये त्यांनी श्याम या दमदार तरुणाची भूमिका केली होती. हा चित्रपट गाजला. पुढे गुलजार यांच्या अचानक



(१९७३) या चित्रपटात त्यांनी रणजित खन्ना या प्रामाणिक सैनिकी अधिकाऱ्याची केलेली करारी भूमिका लक्षणीय ठरली. याच टप्प्यावर ते खलनायकाच्या भूमिकेकडून नायकाच्या भूमिकेकडे वळले. नायक अथवा सहनायक अशा भूमिका साकारत त्यांनी आपली यशस्वी वाटचाल कायम ठेवली. फरेबी, हत्यारा, आप की खातिर, राजमहल, द बर्निंग ट्रेन, इम्तिहान, खूनपसीना, मेमसाब, प्रेम कहानी, इन्कार, कुर्बान, दयावान, हेराफेरी, अमर अकबर अँथनी, हाथ की सफाई, इन्सान, नेहले पे देहला, रेश्मा और शेरा, सरकारी मेहमान, दौलत, लेकिन, मीरा, हमशकल, शंकर शंभू, आरोप, परिचय, एक हसीना दो दिवाने अशा अनेक चित्रपटांमधून त्यांनी त्यांच्या अभिनयाचा ठसा उमटवला. प्रकाश मेहरा दिग्दर्शित हाथ की सफाई (१९७५) या चित्रपटामध्ये रणधीर कपूर यांच्यासोबत विनोद खन्ना सहनायक होते. एकीकडे मोठा तस्कर तर दुसरीकडे प्रेमळ नवरा अशी भूमिका या चित्रपटात त्यांनी निभावली.

विनोद खन्ना यांनी चित्रपटाबरोबरच राजकारणातही सक्रिय सहभाग घेतला आणि ते यशस्वीही ठरले. १९९७ साली त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आणि ते पंजाबमधील गुरुदासपूर मतदार संघातून तीन वेळा खासदार म्हणून निवडून आले. ते पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री होते. पुढे परराष्ट्र व्यवहार खात्यातही कार्यरत होते.

विनोद खन्ना यांना अनेक पुरस्कार मिळाले. वयाच्या ७०व्या वर्षी मुंबईमध्ये २७ एप्रिल २०१७ रोजी त्यांचे कर्करोगाने त्यांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

# वॉरंटी नसतानाही बदलून मिळेल स्क्रीन आणि बॅटरी

सॅमसंग ग्रीन लाइन इश्यू असणाऱ्या फोन्सची स्क्रीन मोफत रिप्लेस करत आहे. तसेच फ्री बॅटरी आणि किट रिप्लेसमेंटदेखील देत आहे. सॅमसंगची हा ऑफर आउट ऑफ वॉरंटी डिवाइसेससाठीदेखील आहे.



सॅमसंगच्या प्रीमियम स्मार्टफोन्स Galaxy S21 सीरीज आणि Galaxy S22 सीरीजच्या डिस्प्लेमध्ये ग्रीन लाइनची समस्या येत आहे. फोनमध्ये येणारी ही समस्या यावर्षीच्या सुरुवातीपासून येत असल्याची माहिती अनेक रिपोर्ट्र्समधून समोर आली आहे. डिस्प्लेमध्ये आलेल्या या बिघाडामुळे युजर्सची चिंता वाढली होती. आता कंपनीनं या फोनच्या युजर्सना मोठा दिलासा दिला आहे. सॅमसंग ग्रीन लाइन इश्यू असलेल्या सर्व फोन्सची स्क्रीन मोफतमध्ये रिप्लेस (फ्री-ऑफ-कॉस्ट वन-टाइम रिप्लेसमेंट) करेल. सॅम मोबाइलच्या रिपोर्टनुसार सॅमसंगच्या या ऑफरचा फायदा आउट ऑफ वॉरंटी डिवाइसेस देखील घेऊ शकतात.


विशेष म्हणजे कंपनी ग्रीन लाईन इश्यू असलेल्या फोन्सच्या स्क्रीन रिप्लेसमेंटसह मोफत बॅटरी आणि किट रिप्लेसमेंट देखील देत आहे. युजर या ऑफरचा फायदा ३० एप्रिल पर्यंत घेऊ शकतात. या सर्व्हिससाठी युजर्सना सॅमसंग सर्व्हिस सेंटर जावं लागेल. सॅमसंगच्या सुपर ॲमोलेड डिस्प्ले असलेल्या फोन्समध्ये ही समस्या गेली अनेक दिवस येत आहे. यामुळे कंपनीला काही मार्केट्समध्ये वन-टाइम फ्री स्क्रीन रिप्लेसमेंट द्यावी लागली आहे. गॅलेक्सी एस२० सीरीज आणि नोट२० सीरीजमध्ये देखील ही समस्या येत होती.

सॅमसंग सध्या आपल्या गॅलेक्सी एफ सीरीजचा नवीन फोन गॅलेक्सी एफ५५ लाँच करण्याची तयारी करत आहे. गुगल प्ले कंसोलच्या लिस्टिंगमध्ये गॅलेक्सी एफ५५ चे जे फीचर आणि स्पेसिफिकेशन सांगण्यात आले आहेत, त्यानुसार हा अलीकडेच आलेल्या गॅलेक्सी एम५५ ५जी चा रीब्रँडेड व्हर्जन असू शकतो. गॅलेक्सी एफ५५ मध्ये कंपनी प्रोसेसर म्हणून स्नॅपड्रॅगन ७ जेन १ चिपसेट देणार आहे. फोन ८जीबी रॅमसह येईल, याचा डिस्प्ले १२०हर्ट्झच्या रिफ्रेश रेटला सपोर्ट करेल. गॅलेक्सी एफ५५ ला इखड म्हणजे ब्यूरो ऑफ इंडियन स्टॅंडर्ड्स वरदेखील लिस्ट झाला आहे. तसेच फोन सॅमसंग इंडियाच्या सपोर्ट पेजवरदेखील दिसला आहे.

# ज्योतिर्विद शंकर बाळकृष्ण दीक्षित

भारतीय ज्योतिषशास्त्र व गणिती शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनी भारतीय ज्योतिषशास्त्राच्या इतिहासाचा आढावा घेऊन त्यावरून त्यांनी काही ग्रंथांचे व घटनांचे काळ ठरविले तसेच भारतीय ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासाला पुनश्च चालना दिली. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

शंकर दीक्षित यांचा जन्म व प्राथमिक शिक्षण रत्नागिरी जिल्ह्यातील मुरूड गावी झाले. याच काळात त्यांनी घरी संस्कृत व वैदिक विषयांचा प्राथमिक अभ्यास पूर्ण केला. नंतर दोन वर्षे त्यांनी दापोलीच्या कोर्टात उमेदवारी केली व त्याच काळात इंग्रजीचे थोडे अध्ययनही केले. नंतर ते पुण्याच्या प्रशिक्षण महाविद्यालयात दाखल झाले व १८७४ साली ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. याच काळात त्यांनी दुसऱ्या शाळेत इंग्रजीचे अध्ययनही केले. तद्नंतर त्यांनी रेवदंडा, ठाणे व बार्शी येथे मुख्याध्यापक आणि पुढे धुळे व पुणे येथील प्रशिक्षण महाविद्यालयांत अध्यापक म्हणून काम केले. या काळातच त्यांनी ज्यातिषशास्त्र व गणित यांचा तपशीलवार अभ्यास केला आणि भारतीय ज्योतिषशास्त्रातील विविध सिद्धांतांची माहिती करून घेतली. यासाठी त्यांनी पाचशेहून अधिक संस्कृत ग्रंथांचा अभ्यास केला होता. अशा प्राचीन भारतीय



## निमित्त

ग्रंथांमधील उल्लेखांवरून काही ग्रंथांचे काळ त्यांनी निश्चित केले. उदा., शतपथ ब्राह्मणातील एका ऋचेच्या आधारे त्यांनी त्या ग्रंथाचा काळ इ. स. पू. ३००० वर्षे, तसेच वेदांगज्योतिषाचा काळ इ. पू. १४०० वर्षे असा निश्चित केला. यावरून इतिहास व ज्योतिषशास्त्राचा विकास यांच्यात संगती लावण्याचा प्रयत्न त्यांनी केला. शिवाय वैदिक काळात कोणत्या ज्योतिषशास्त्रीय गोष्टी माहित होत्या, तेही त्यांनी सप्रमाण दाखवून दिले. ग्रीक आणि भारतीय ज्योतिषशास्त्रीय विचारांचा तुलनात्मक अभ्यास करून भारतीय ज्योतिषशास्त्र हे स्वतंत्र वेध व संशोधन यांद्वारे भारतातच विकसित झालेले शास्त्र आहे, हे त्यांनी सिद्ध केले. पंचांग शोधनाचे शास्त्र, नक्षत्रसंस्था व अंकगणित हे भारतीयांनी जगाला दिल्याचे त्यांनी दाखवून दिले. उलट राशी व वार ही मूळची भारतीय नव्हेत, असेही त्यांना आढळून आले. त्यांचा फलज्योतिषावर विशेष विश्वास नव्हता, पण ते त्यावर विचार करीत होते.

दीक्षित यांनी मराठी व इंग्रजीत विपुल लेखन केले असून त्याद्वारे सोप्या व मनोरंजक भाषेत विविध शास्त्रीय विषयांची माहिती करून दिलेली आहे. विद्यार्थिबुद्धिवर्धिनी, सृष्टचमत्कार, ज्योतिर्विलास, भारतीय ज्योति:शास्त्र, धर्ममीमांसा आणि सोपपत्तिक अंकगणित, धर्ममीमांसा आणि सोपपत्तिक अंकगणित हे ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. इंडियन कॅलेंडर हा इंग्रजी ग्रंथ त्यांनी आणि रॉबर्ट सेवेल यांनी मिळून लिहिला असून त्यातील इ. स. ३०० ते १९००पर्यंतच्या तिथीतारखांचा मेळ घालणारी सारणी दीक्षितांची आहे. इंडियन अँटिक्वेरी एपिग्राफिका इंडिका, शालापत्रक व ज्योतिषकल्पतरू या मासिकांत व नेटिव्ह ओपिनियन या दैनिकात विविध शास्त्रीय विषयांवर त्यांनी लेख लिहिले होते. लेले व मोडक यांच्या सहाकार्याने त्यांनी सायन पंचांग काही दिवस काढले. या सहकाऱ्यांच्या मृत्यूनंतरही त्यांनी ते थोडे दिवस पदरमोड करून चालविले होते. ते विषमज्वराने पुण्याला मृत्यू पावले. **(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**रत्नागिरी : कोकण किनारपट्टीवरील दापोली येथील कर्दे हा एक प्राचीन आणि शांत समुद्रकिनारा म्हणून ओळखला जातो.**

## आरोग्य प्रहर

# उन्हाळ्यात केस गळतीची समस्या कशी टाळावी?

उन्हाळ्यात घाम येत असल्याने अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यापैकीच एक समस्या म्हणजे कोंडा होणे किंवा केस गळणे. कोंडा झाल्याने डोक्याला खाज सुटते आणि हळूहळू केस गळती सुरु होती. केस गळतीमुळे अनेकांना टक्कल पडण्याची समस्यांचा सामना करावा लागतो. केस गळती होऊ नये म्हणून काय करावे जाणून घ्या तज्ज्ञ काय सांगतात...



उन्हाळ्यामध्ये अनेकांना केसांची समस्या ही उद्भवू शकते. यामध्ये तेलकट टाळू, घाम आणि धूळ यामुळे कोंडा, खाज सुटणे आणि केस गळती याचा समावेश असतो. याची नेमकी कारणे काय? आणि कशा प्रकारची खबरदारी घ्यायला हवी, जाणून घ्या.

केस गळण्याचे कारण म्हणजे शरीरात काही आवश्यक पोषक तत्वांची कमतरता हे आहे. काही लोक केसांमध्ये कोंडा झाल्यास लिंबू लावतात, परंतु असे अजिबात करू नये. यामुळे नंतर समस्या निर्माण होतात. ओले केस जास्त वेळ बांधून ठेवू नयेत.

जेव्हा उन्हाळ्यातील उष्णता असह्य होते तेव्हा आपल्या केसांचे नुकसान होण्यापासून संरक्षण करणे महत्वाचे आहे. टोपी घालून किंवा डोके झाकण्यासाठी स्कार्फचा वापर करणे सूर्यप्रकाशात जाणे टाळणे गरजेचे आहे. कडक उन्हामुळे केस मुळांपासून कमकुवत होतात. त्यामुळेही केस गळणे वाढू शकते. डिहायड्रेशनचा परिणाम केवळ तुमच्या संपूर्ण आरोग्यावरच नाही तर केसांच्या आरोग्यावरही होतो. भरपूर पाणी प्या आणि केसांच्या वाढीस प्रोत्साहन देणारे जीवनसत्त्वे ए, सी आणि ई जीवनसत्वाने समृद्ध असलेले पदार्थांचा आहारात समावेश करा.

फळे, भाज्या आणि प्रथिने यांचा समावेश असलेला आहार हा तुमच्या केसांना निरोगी राहण्यासाठी मदत करतो आणि आवश्यक पोषक तत्त्वे पुरवतो. त्यामुळे तुम्ही केसगळती रोखू शकाल आणि केस मजबूत होण्यास यामुळे मदत मिळू शकते. केस गळण्याची समस्या टाळण्यासाठी कांद्याचा रस अतिशय प्रभावी आहे. यात सल्फरचे प्रमाण चांगले असते, ज्यामुळे टाळूतील रक्ताभिसरण वाढते. ज्यामुळे केसांची वाढ होते. याव्यतिरिक्त कांद्याच्या रसात अँटी-फंगल गुणधर्म देखील असतात, जे टाळूशी संबंधित समस्या दूर करतात.

केस गळतीवर उपचार करण्यासाठी मेथी हा अतिशय प्रभावी उपचार आहे. मेथीमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे केसगळती नियंत्रित करून केसांच्या वाढीस मदत करतात.

# जलजीवन मिशनची रायगडात ६१३ कामे पूर्ण

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत राजिपच्या माध्यमातून एक हजार ४९६ पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात आल्या असून, यापैकी ६१३ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत, तर ४० योजनांची कामे अंतिम टप्प्यात आहेत. पाणीपुरवठा योजना पूर्ण होऊन, घराघरात नळ कनेक्शन दिल्याने ग्रामीण भागातील महिलांना दिलासा मिळाला आहे.

जनतेला स्वच्छ आणि शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, तसेच गावातील महिलांचा त्रास कमी व्हावा, यासाठी केंद्र सरकारमार्फत जलजीवन मिशन ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने चांगलीच कंबर कसली आहे. या योजनेमध्ये प्रतिदिन प्रतिमाणसी किमान ५५ लिटर याप्रमाणे पाण्याची उपलब्धता करणे अपेक्षित आहे. जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या योजनांची

### ग्रामीण भागातील महिलांना दिलासा

कामे गुणवत्तापूर्वक पूर्ण होण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाच्या माध्यमातून नियमित योजनानिहाय कामांची माहिती घेण्यात येत आहे. अधिकारी कामांना भेटी देऊन कामाची पाहणी करीत आहेत.

या योजनेच्या माध्यमातून १५ तालुक्यांमध्ये एक हजार ४९६ योजनांची कामे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या वतीने हाती घेण्यात आली आहेत. यामधील ६१३ योजनांची



कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या सर्व योजनांची त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करून, योजना संबंधित ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात आल्या आहेत.

जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या योजनांची कामे गुणवत्तापूर्वक पूर्ण होण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाच्या माध्यमातून नियमित योजनानिहाय कामांची माहिती घेण्यात येत आहे. अधिकारी कामांना भेटी देऊन कामाची पाहणी करीत आहेत.

> **जलजीवन मिशन अंतर्गत ६१३ योजनांची कामे पूर्ण करण्यात आली असून पुढील महिनाभरात ४९ योजनांची कामे पूर्ण होतील. सुरू असलेली पाणीपुरवठा योजनांची कामे गुणवत्ता पूर्ण होण्यासाठी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक कामाची माहिती वेळोवेळी घेण्यात येत आहे.**
> **–डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप**

# खोपोलीतील सांडपाण्याची पाताळगंगा नदीत विल्हेवाट

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात; उपाययोजनेची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**



खालापूर तालुक्यातील अनेक गावांच्या पेयजल योजना पाताळगंगा नदीवर असून या पाताळगंगा नदीपात्रात खोपोलीकरांचे सांडपाणी थेट सोडले जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. तालुक्याची जीवनदायिनी असलेली पातळगंगा प्रदूषणाच्या विळख्यात अडकली आहे.

पाताळगंगा नदीत रासायनिक तसेच दूषित सांडपाण्याची विल्हेवाट यामुळे पाताळगंगा नदीचे पाणी प्रचंड प्रदूषित झाले आहे. पाताळगंगा नदीवर खालापूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये पेयजल योजना सुरू आहेत. आतापर्यंत सुरक्षित असलेला गगनगिरी मठाजवळील उद्भवदेखील प्रदूषित झाला आहे.

खोपोली फाटा येथील इंदिरा चौकातून आलेले मोठे गटार थेट पाताळगंगा नदीपात्राला जोडले गेले आहे. नागरी वस्तीतून येणारे घाणेरडे, दुर्गंधीयुक्त पाणी सातत्याने नदी प्रवाहात मिसळत आहे. यात भर म्हणून या ठिकाणी नव्याने उभी राहत असलेल्या इमारतीतूनदेखील सांडपाणी विल्हेवाट करणारे पाईप नदीपात्रात सोडण्यात आले आहेत.

खोपोलीपासून पुढे आपट्यापर्यंत वाहत असलेल्या पाताळगंगा नदीच्या ३०–३५ किमीपर्यंतची अनेक गावे नदीतील पाण्याचा वापर दैनंदिन तसेच पिण्यासाठी वापरतात. अनेक ग्रामपंचायतीकडे जलशुद्धीकरणाची सक्षम यंत्रणा नसल्याने दूषित पाणी थेट ग्रामस्थांच्या पोटात जात आहे.

याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाने तातडीने ठोस कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### खोपोली नगर परिषदेला नोटीस

प्रदूषण नियंत्रण मंडळाने खोपोली नगर परिषदेला नोटीस बजावली होती. तातडीने सांडपाणी उपचार प्रक्रिया संयत्र कार्यान्वित करण्याचे आदेश दिले आहेत. याला सहा महिने झाले तरी उपाययोजना झालेली नाही.

> **सांडपाणी विल्हेवाट होत असलेल्या ठिकाणी तपासणी करण्यात येईल. त्यासाठी योग्य ती उपाययोजना करून प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.**
> **–संदेश मेंगाळ, कनिष्ठ अभियंता, पाटबंधारे विभाग**

# माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात सिटीस्कॅन मशीन दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव उपजिल्हा रुग्णालयात सिटीस्कॅन मशिनची अत्यंत गरज होती. ही सिटीस्कॅन मशीन एका खासगी कंपनीमार्फत शासनाने बसवली असून ती अवघ्या ३० दिवसांत ती सज्ज होणार आहे.

या सिटीस्कॅनमुळे रुग्णावर निदान करून योग्य उपचार होणार असल्याने अशा रुग्णांना जीवदान मिळणार आहे.

यापूर्वीची माणगाव उपजिल्हा रूग्णालयातील सिटीस्कॅन मशीन सात वर्षांपासून बंदच होती. या मशिनच्या दुरूस्तीसाठी शासनाकडून अनेक वेळा तांत्रिक उपचार करण्यात आले, मात्र हे कोमात गेलेले



सिटीस्कॅन मशीन सात वर्षानंतरही शुद्धीवर आलेच नाही. अखेर सिटीस्कॅन मशिनचे संबंधित तंत्रज्ञ बोलावून मशीनची पाहणी केली असता हे सिटीस्कॅन मशिन डेड असल्याने त्याचे निर्लेखन करावे, असा माणगाव उपजिल्हा रुग्णालयाला दाखला दिला होता. त्यानंतर शासनाने नवीन सिटीस्कॅन मशीन एका खासगी कंपनीमार्फत बसविण्यासाठी परवानगी दिली.

सार्वजनिक खासगी भागीदारी तत्त्वावर बसविले असून उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना मोफत तर खासगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना अत्यल्प दरात केले जाणार आहे. त्यामुळे रुग्ण व नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

# खोपोलीला अवकाळी पावसाने झोडपले

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरात व परिसरात शुक्रवारी (दि.२६) सकाळी अवकाळी पावसाच्या सरी पडल्या. ढगांचा गडगडाट व त्यानंतर आलेल्या पावसाने सकाळी कामावर निघालेल्या कामगारांची धांदल उडाली.

सकाळी ६.३० वा.च्या दरम्यान पावसाचे आगमन झाले. पावसामुळे वातावरणात काहीसा थंडावा निर्माण झाला, परंतु दुपारी भयानक उकडल्याने अंगाची लाही लाही झाली.

लग्नसराईचा काळ असल्याने सकाळच्या आलेल्या पावसाने यजमानांच्या पोटात गोळा उठला होता, मात्र पाऊस थांबल्याने यजमानांच्या जीवात जीव आला.




# रेवदंडा बाजारपेठेत वाहतूक कोंडी कायम

## नागरिकांसह पर्यटक हैराण; रस्ता रूंदीकरणाची गरज

**रेवदंडा : प्रतिनिधी**

लग्नसराई व आगोटची तयारी यासाठी रेवदंडा बाजारपेठेतील खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांची गर्दी वाढली आहे, बाजारपेठेतील रस्ता अरूंद असल्याने वाहतूक कोंडी होत असून यामुळे नागरिक, पर्यटक हैराण झाले आहेत.

अलिबाग, मुरुड व रोहा तालुक्याला मध्यवर्ती ठिकाण असलेले रेवदंडा शहरातील बाजारपेठेत कायमच गर्दी असते. आजूबाजूच्या विविध गावांसह रेवदंडा, थेरोंडा, चौल, आग्राव आदी पंचक्रोशीतील ग्राहक रेवदंडा बाजारपेठेत येतो. त्यामुळे रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद



रस्ता या गर्दीने आणखीनच अरूंद होतो. या ठिकाणी पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था नसल्याने खरेदी करण्यासाठी आलेले नागरिक रस्त्याच्या कडेला वाहने उभी करतात. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे.

विशेषतः पारनाका येथे ही गर्दी प्रामुख्याने जाणवते. पारनाक्यावरील भाजीमार्केटमध्ये विक्रेते व ग्राहकांची गर्दी होते. शिवाय मुख्य रस्त्याने मुरूड व अलिबागकडे नित्याची वाहतूक सुरू असते. अशात समोरून एसटी बस आल्यास एकाच वेळी दोन वाहने जाण्यास अडचणीचे ठरते. परिणामी बाजारपेठेत वाहतूक कोंडी समस्या निर्माण होते.

याबाबत तातडीने कार्यवासही करून स्वतंत्र पार्किंगची सोय अथवा रस्त्याचे रूंदीकरण करावे, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरीत आहे.



नागोठणे : ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता भैरवनाथ महाराज पालखी सोहळा मराठा आळी येथे आली, त्या वेळी पालखीला खांदा देताना भाजप नेते आनंद लाड व कुटुंबीय. (छाया : शामकांत नेरपगार)

# रेशनिंग दुकानदारांना नवीन ई–पॉस मशीनचे वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

आधारकार्डशी रेशनकार्ड लिंक करून रेशन वितरित करण्यासाठी ई–पॉस यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे, मात्र या मशीनमध्ये वारंवार तांत्रिक बिघाड होत असल्याने नागरिक व दुकानदारांमध्ये वारंवार वादविवाद होत आहेत. त्यामुळे तालुक्यातील १४४ आणि नगर परिषद हद्दीतील नऊ अशा एकूण १५३ दुकानदारांना ई–पॉस मशिन देण्यात आले.



पॉस मशिन वापरातील अनेक अडचणी व ग्राहकांबरोबर होणाऱ्या वादविवाद टाळण्यासाठी तहसीलदार शीतल रसाळ आणि पुरवठा विभागातील अधिकारी बी. टी. बुरसे यांनी जुने मशीन ताब्यात घेऊन नवीन ई–पॉस मशीन सर्व राशन दुकानदारांना देण्यात आले.

सातत्याने सर्वच दुकानांमध्ये हा सावळा गोंधळ सुरू आहे. रोजंदारीवर कामाला जाणारे कार्डधारक सकाळी ७ वा.पासून दुकानांसमोर ताटकळत उभे असतात.

दुकानात धान्यसाठा शिल्लक असूनसुद्धा मशीनवर धान्य उपलब्ध होत नसल्यामुळे धान्य देता येत नाही. या प्रकारामुळे अनेक लाभार्थी हवालदिल झाले होते. वारंवार उद्भवणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांनी नवीन ई – पॉस मशीनचे वाटप करून ती समस्या तहसील कार्यालयातून सोडविण्यात आली आहे.

# इंदापूर येथे पथनाट्य, रॅलीतून मतदान जनजागृती

**माणगाव : प्रतिनिधी**


इंदापूर येथे नुकतेच नवजीवन विद्यामंदिर तळाशेत व तळाशेत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती करण्यात आली. तळाशेत शाळेतून रॅलीला सुरुवात करून संपूर्ण इंदापुरात मतदान जनजागृती करण्यात आली.

सर्वांनी मतदान करावे या यासाठी नवजीवन विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले व मतदान करण्याचा संदेश देण्यात आला.



कलाशिक्षक अजित भोपी यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश ढेपे यांनी केले. मुख्याध्यापक अशोक गावडे, शिक्षक अमोल गुरव, प्राजित पवार, विद्यालयातील शिक्षक, कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

# काळिंजेच्या खाडीमध्ये दुर्मीळ समुद्री घोड्याचे दर्शन





**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील काळिंजेच्या खाडीत दुर्मीळ समुद्री घोड्याचे दर्शन झाले आहे. मच्छीमारांना मासेमारी करताना हा जीव जाळ्यात सापडला. त्यांनी त्याला पुन्हा खाडीत सोडले.

श्रीवर्धन तालुक्यापासून १३ किमी अंतरावरील काळिंजे गावामध्ये कांदळवन पसरले आहे. याठिकाणी खाडीच्या मध्यभागी असलेल्या बेटाभोवती कांदळवनांचे दाट आच्छादन आहे. काळिंजे गावातील लोकांचा प्रमुख व्यवसाय म्हणजे मासेमारी. मंगळवारी येथील मच्छीमार अनिस फणसोपकर खाडीत मासेमारी करत असताना त्यांना जाळ्यात समुद्री घोडा आढळला.

खाडीत कोळंबी पकडण्यासाठी पाग टाकलेला असताना, त्या जाळ्यात नारंगी रंगाचा समुद्री घोडा आढळल्याची माहिती फणसोपकर यांनी दिली. त्यांनी लागलीच या समुद्री घोड्याला जाळ्याबाहेर काढले आणि याची माहिती कांदळवन प्रतिष्ठानाचे सहायक संशोधक मोहन उपाध्ये यांना दिली. त्यांनी या समुद्री घोड्याची पाहणी करून फणसोपकर आणि विक्रांत गोगरकर यांच्या मदतीने पुन्हा त्याला खाडीत सोडले. या समुद्री घोड्याची लांबी १३ सेमी होती. समुद्री घोडा हा भारतीय वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत संरक्षित असून, त्याला वाघाएवढे संरक्षण देण्यात आले आहे.

काळिंजे खाडीत कांदळवनांवर आधारित निसर्ग पर्यटन सुरू आहे. गावातील स्थानिक लोक कांदळवन कक्षाच्या मदतीने निसर्ग पर्यटन करत आहेत. या खाडीत कांदळवनांच्या ११ प्रजाती आढळत असून, पक्ष्यांच्या सुमारे ८०हून अधिक प्रजातींची नोंद करण्यात आली आहे. तसेच पाणमांजरांचा अधिवास या परिसरात पाहावयास मिळतो. महत्त्वाचे म्हणजे चारही बाजूंनी खाऱ्या पाण्याने वेढलेल्या बेटाच्या मध्यभागी गोड्या पाण्याच्या विहिरी असून, तिथे कोल्हे व रानडुकरांचे अस्तित्व आहे. त्यामुळे येथील जैवविविधता लक्षात घेऊनच निसर्ग पर्यटनाला सुरुवात केली आहे.

# महिलेची एसटीमध्ये विसरलेली बॅग केली परत

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड बसस्थानकात एक महिला तिची बॅग विसरली, ही बाब एका व्यक्तीने पोलादपुरातील सामाजिक कार्यकर्त्यांना कळविल्यानंतर पिंपरी चिंचवड–खेड बसमध्ये विसरल्याची माहिती मिळाल्यानुसार, या कार्यकर्त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे महिलेची मिळालेली बॅग तिच्या नातेवाईकांनी येऊन ताब्यात घेतली.



भोरघाट बंद झाल्याने महाड शहरातील एसटी स्थानकात पिंपरी चिंचवड–खेड एसटीमधून रेश्मा विकास पवार (वय ४०, रा.माझेरी, सध्या रा. पुणे) या उतरल्या. ही बस पुढे खेडकडे जाणार असल्याने आधी पोलादपूर स्थानकामध्ये थांबेल, अशी खात्री असलेल्या सचिन सावंत यांनी महेश निकम यांना फोन लावून महिलेची बॅग पिंपरी चिंचवड–खेड या एसटी बसमध्ये विसरल्याची माहिती सांगितली. महेश निकम यांनी प्रतीक सुर्वे यांच्यासह एसटी स्थानकामध्ये जाऊन चौकशी केली असता, एसटी बस खेडकडे रवाना झाली. मग पोलादपूर एसटी स्थानकातील वाहतूक नियंत्रक दिनकर कासार यांनी लगेच खेड आगारामध्ये फोन लावून झालेला प्रकार सांगितला आणि ती बॅग परत दुसऱ्या बसने पोलादपूरला पाठवायला सांगितले. थोड्या वेळाने ती बॅग पोलादपूरला पोहोचली. या वेळी महिलेच्या बहिणीच्या पतीने बॅग ताब्यात घेतली. बॅगमध्ये रेश्मा विकास पवार या महिलेचे दहा हजार रुपये रोख रक्कम आणि अडीच तोळ्याचे दागिने असल्याची खात्री त्यांच्या बहिणीचे पती नांगलवाडी येथे कंपनीच्या सोसायटीमध्ये राहणारे रूपेश पवार यांनी ही बॅग स्विकारून आभार मानले.

महाड एसटी बस स्थानकामध्ये घडलेल्या बॅग विसरण्याच्या घटनेनंतर पोलादपूर बस स्थानकामध्ये बॅग परत मिळाल्याने प्रवासी व एसटी महामंडळाचे कर्मचारी व प्रवासी महिलेच्या भावोजींनी महेश निकम व प्रतीक सुर्वे यांच्यासह वाहतुक नियंत्रक दिनकर कासार यांना धन्यवाद दिले.


## जाहीर नोटीस

**TIPL PAY & PARK KALAMBOLI (5. NO. PARKING KALAMBOLI) आणि TIPL PAY & PARK DRONAGIRI (THAKUR PARKING)**

मध्ये उभ्या केलेल्या वाहनांच्या मालकांनी जवळ जवळ दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीमध्ये न नेलेल्या वाहनांची विक्री नोटीस

| SR NO | Vehicle Type | Token No. | Vehicle No. | In Date / Time | LOCATION | DATE 31/05/2024 UNPAID BALANCE |
|---|---|---|---|---|---|---|
| (A) TIPL PAY & PARK KALAMBOLI (5.NO.PARKING KALAMBOLI) | | | | | | |
| 1 | Horse | 1566026 | TS08UH0918 | 12/02/2021 2:02:26 | In to shoppers | 1,80,600/- |
| 2 | Tempo | 1628575 | MH46AR6305 | 17/08/2021 13:20:09 | In to Shoppers | 1,52,700/- |
| 3 | 3 Axle Truck | 1644021 | KA01AE0472 | 27/09/2021 15:42:24 | In to Shoppers | 2,13,963/- |
| 4 | Horse | 1645656 | MH04JK4406 | 01/10/2021 22:32:20 | In to Shoppers | 1,45,950/- |
| 5 | 3 Axle Truck | 1672229 | KA01AD7427 | 11/12/2021 16:56:30 | In to Shoppers | 1,97,538/- |
| | | | | | Total | 8,90,751/- |
| (B) TIPL PAY & PARK DRONAGIRI (Dronagiri PARKING) | | | | | | |
| 1 | Horse with Trailer | 626887 | MH14DM8077 | 01/05/2021 12:24:17 | Line No.8 | 2,72,492/- |
| 2 | Horse with Trailer | 680629 | MH06AC3073 RTO | 08/10/2021 14:00:30 | Line No.8 | 2,33,772/- |
| 3 | Horse with Trailer | 680674 | MH06AQ7849 RTO | 08/10/2021 16:50:01 | Line No.8 | 2,33,772/- |
| | | | | | Total | 7,40,036/- |
| एकूण थकीत पार्किंग भाडे (A+B) | | | | | | 16,30,787/- |

उपरोक्त निर्देशित यादी मधील वाहनांच्या मालक/चालक/ट्रान्सपोर्टर्स/फाईनान्सर्स/हितसंबंध असणाऱ्या सर्वांना आरटीओकडून व अन्य माध्यमातून पत्ते उपलब्धते नुसार पत्र व्यवहारने संबंधित वाहने वाहनतळाचे भाडे भरणा करुन घेऊन जाण्याचे कळविले आहे परंतू या विनंती प्रमाणे या निर्देशित वाहनांचे मालक/चालक/फायनान्सर/हितसंबंधितांनी योग्य प्रतिसाद दिलेला नाही या कारणाने या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, वरील तक्त्यामधील निर्देशित वाहने त्यांचे समोर दाखविलेल्या तारखेपासून आमच्या वाहनतळांमध्ये ज्यांनी आणून भंगार आवस्थेत उभी करुन ठेवलेली आहेत. त्यांनी संदर्भीय तारखेपासून ही वाहने उभी केल्यानंतर आजतागायत कोणात्याही प्रकारे या वाहनांचे पार्कींग भाडे, भरणा करण्यात आलेले नाही. संदर्भीय वाहने उभी केल्यापासून दिनांक ३१/०५/२०२४ पर्यंत वरील तक्त्यात दाखविल्या प्रमाणे प्रत्येक वाहनांचे पार्कींग भाडे थकीत आहे. सदरहू वाहनांचे भाडे ते प्रत्येक वाहन बाहेर नेई पर्यंत प्रत्येक दिवसाला वाहनतळांच्या नियमाप्रमाणे वाढत आहे.

तरी सर्व सबंधितांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दी पासून १५ दिवसांचे आत आमच्या खालील निर्देशित पत्त्यावर पार्कींगची पावती /कार्ड घेऊन संपर्क साधावा व पार्कींगचे थकित भाडे भरणा करावे आणि वरील निर्देशित वाहनांच्या मालक/चालक/ट्रान्सपोर्टर्स/फाईनान्सर्स/हितसंबंध असणारांनी थकीत पार्कींग भाड्याची रक्कम भरणा पावती घेऊन त्यांचे संबंधित वाहन बाहेर घेऊन जावे.

वरील प्रमाणे दिलेल्या मुदत कालावधीमध्ये संदर्भीय वाहनांचे मालक/चालक/ट्रान्सपोर्टर्स/फाईनान्सर्स/हित संबंधी यांनी वाहनांचे थकित भाडे भरणा न केल्यास त्यानंतर जाहीरात प्रसिध्दीपासून पुढील ३० दिवसानंतर संदर्भीय वाहनांची भंगारात विक्री करुन पार्कींगचे थकित भाडे वसूल केले जाईल व त्यानंतर कोणत्याही प्रकारे संदर्भीय वाहनांचे मालक/चालक/ट्रान्सपोर्टर्स/फाईनान्सर्स/हितसंबंधी यांचे हक्क व अधिकार विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच संबंधितांच्या कोणत्याही नुकसानीस, तक्रारीस TIPL व्यवस्थापन जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

वरील तक्त्यातील संदर्भीय वाहनांचे भंगार खरेदी बाबत याच नोटीसीच्या संदर्भाने भंगार खरेदीदारांनी त्यांचे सिलबंद पाकीटात भंगार वाहनांच्या खरेदीचे दर, खालील सही करणारांस नोटीसीच्या प्रसिध्दीपासून ३० दिवसात सादर करावेत. जो निर्देशित वेळे मध्ये या वाहनांचे थकित पार्कींग भाडे एकूण रक्कम १६,३०,७८७/– (सोळा लाख तीस हजार सातशे सत्त्यांऐंशी रूपये मात्र) वा भंगार खरेदीची सर्वांमध्ये जास्त रक्कमेची बोली वाहननिहाय देवून, एकरक्कमी रक्कम देण्याचे दर सिलबंद पाकीटात देईल त्यांस वाहनांचा ताबा देण्यात येईल. संदर्भीय वाहनांचा भंगार म्हणून ताबा घेतल्यानंतर या वाहनांची सर्व जबाबदारी भंगार खरेदीदारांची राहील व तद्पश्चात या वाहनांचे अनुषंगाने कोणत्याही परीणामास TIPL व्यवस्थापन जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे.

पनवेल
दि.:२७/०४/२०२४

**व्यवस्थापक**
**TIPL PAY & PARK KALAMBOLI**
नोटीस प्रसिध्दी करणारे

**व्यवस्थापक**
**TIPL PAY & PARK DRONAGIRI**
नोटीस प्रसिध्दी करणारे

# गप्पी मासे पाळा, हिवताप टाळा!

## पनवेल मनपातर्फे हिवताप दिनानिमित्त कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक हिवताप दिन २५ एप्रिल रोजी साजरा केला जातो. या निमित्ताने प्रभारी आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभाग, घनकचरा व स्वच्छता विभाग यांच्यावतीने स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी उपायुक्त डॉ. वैभव विधाते व मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.





या वेळी पशुधन अधिकारी डॉ. भगवान गीते, साथरोग वैद्यकिय अधिकारी डॉ. आकाश ठसाळे, आरोग्य निरीक्षक संजय जाधव, बहुद्देशीय कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते. या वेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते म्हणाले, हिवताप निमुर्लनासाठी स्वच्छता वैद्यकिय विभाग व घनकचरा व स्वच्छता विभाग या दोहांनी एकत्रित मिळून काम करणे गरजेचे आहे. यासाठी सर्वांनी मिळून व्यवस्थित योजना आखून हिवतापाचे रूग्ण शून्य व्हावे यासाठी प्रयत्न करावे, अशा सूचना दिल्या.

तसेच मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी म्हणाले, हिवतापाच्या उच्चटनासाठी महापालिकेचे कर्मचारी कायमच प्रयत्न करत असतात. याच्या जोडीला शाळांमधील विद्यार्थी व शिक्षकांमध्येही हिवतापाबद्दल डॉक्टरांच्या माध्यमातून माहिती देऊन जनजागृती करण्यावरती भर देण्याबाबत त्यांनी सूचविले. महापालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने किटकजन्य आजाराच्या निमुर्लनासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. येत्या काही दिवसात पथनाट्याच्या माध्यमातून किटकजन्य आजाराविषयी जनजागृती करण्यात येणार आहे.

**हिवताप टाळण्यासाठी उपाय**

घरगुती वापरातील पाण्याचे हौद, टाक्या, बॅरल, रांजन, आठवड्यातून किमान एकदा पुसून कोरडे करावेत. त्यांना घट्ट झाकणे बसवावीत, कापडाने बांधावीत. डबकी बुजवावीत. पाणी वाहते करावे. साठलेल्या पाण्यात गप्पीमासे सोडावेत. घरातील भंगार सामान, निरुपयोगी टायर्सची विल्हेवाट लावावी. कुलर, चायनीज पलंट व फ्रिज चा ड्रीप पॅन स्वच्छ ठेवावे. शौचालयाच्या नादुरुस्त सेप्टीक टँक दुरुस्त करावयात. शौचालयाच्या व्हेन्ट पाईपला जाळी बसवावी अथवा कापड बांधावे. वैयक्तिक सुरक्षेसाठी डास प्रतिबंधात्मक साधनांचा वापर करावा. ताप आल्यास रक्त नमुना तपासुन घ्यावे. आवश्यक औषधोपचार घ्यावा. हिवतापाचे निदान व औषधोपचार सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये मोफत उपलब्ध आहेत. हिवताप नियंत्रणासाठी हिवताप निदान व उपचार महत्वाचे आहेत.

# सरपटणाऱ्या प्राण्यांनाही उन्हाच्या तडाख्याचा फटका

### गारव्यासाठी नागरी वस्तीत शिरकाव

**उरण : रामप्रहर वृत्त**

एप्रिलच्या सुरुवातीलाच उन्हाचा तडाखा वाढू लागला असून यामध्ये वाढ होण्याची शक्यताही हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली आहे. याचा फटका सरपटणाऱ्या प्राण्यांना बसू लागला आहे. त्यामुळे या प्राण्यांनी आता रहिवासी आणि नागरी वस्तीकडे शिरकाव करण्यास सुरुवात केली आहे. परिणामी अनेक घरांच्या परिसरात विषारी आणि बिनविषारी जातींचे सर्प व प्राणी आढळू लागले आहेत. बुधवारी (दि. २४) एक पाच फुटी नाग एका घराच्या परिसरात शिरला होता. त्याला सर्पमित्रांनी पकडून वाचविला आहे.

उरणच्या डोंगरी आणि जंगल परिसरात मागील अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात मातीचा भराव करण्यासाठी डोंगर उद्ध्वस्त केले जात आहेत. त्यासाठी या जंगलात आगी लावण्यात येत आहेत. या आगीतही जंगलात अदिवास असलेल्या सरपटणाऱ्या प्राण्यांची होरपळ होण्याच्या घटना घडल्या आहेत. दुसरीकडे औद्योगिक विकासात मातीचा भराव करण्यासाठी डोंगरातील माती काढली जात आहे. या मातीच्या भरावातही या प्राण्यांचे अधिवास नष्ट केले जात आहेत. तर



यातील अनेक प्राणी हे मातीतून शहर किंवा गावाच्या ठिकाणी जात आहेत. हेच प्राणी अनेक घरांच्या परिसरात येऊ लागले आहेत.

सर्पमित्र आपला जीव धोक्यात टाकून नागरी वस्तीत येणाऱ्या विषारी आणि बिनविषारी प्राण्यांना वाचविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये ही जागृती निर्माण झाली आहे. सर्पमित्रांमुळे वन्यजीवांचे प्राण वाचतात, असे अनेकांनी सांगितले.

# बेवारस वाहनांचा लिलाव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सानपाडा पोलीस ठाण्याच्या आवारातील बेवारस पडून असलेल्या ३४ -मोटार दुचाकी, २-ऑटो रिक्षा अशा एकूण ३६ बेवारस वाहनांचा दि. ०२ मे, २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता लिलाव करण्यात येणार असल्याची माहिती सानपाडा पोलीस ठाणे नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार पन्हाळे यांनी दिली आहे.

सानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध कारणास्तव प्राप्त झालेली दुचाकी, तीनचाकी आणि, अशी एकूण ३६ बेवारस वाहने सानपाडा पोलीस ठाण्याच्या आवारात एकत्र करून ठेवण्यात आली आहेत. या वाहनांच्या मूळ मालकांचा अथवा ताबा धारकांचा सर्वत्र परी तपास करण्यात आला असून या बेवारस वाहनांसाठी कोणीही मालकी हक्क दाखविलेला नाही. त्यामुळे मा. न्यायलयाच्या परवानगीने २ मे २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता या बेवारस वाहनांचा लिलाव करण्यात येणार आहे. या ३६ वाहनांची तपशीलवार यादी सानपाडा पोलीस ठाण्याच्या सूचना फलकावर लावण्यात आली आहे.

या लिलावात जास्तीत जास्त स्क्रॅप खरेदी विक्री करणाऱ्या व्यवसायिकांनी तसेच नागरिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन सानपाडा पोलीस ठाणे नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार पन्हाळे यांनी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# पथनाट्यातून मतदानाचा संदेश; नवी मुंबईतील शाळा, महाविद्यालयांमध्ये उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

नाटक हे संदेश प्रसारित करण्याचे अत्यंत प्रभावी माध्यम असून पथनाट्याद्वारे मनोरंजनातून प्रबोधन करण्याची मोठी परंपरा आपल्याकडे आहे. समाज जागृतीचा संदेश हसत खेळत, दैनंदिन जीवनातील उदाहरणे देत लोकांपर्यंत पोहचवणारी पथनाट्ये नेहमीच जनजागृतीचे लोकप्रिय माध्यम राहिलेली आहेत. याचाच उपयोग मतदान विषयक जनजागृती करण्याकरिता करण्यात येत असून लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई क्षेत्रातील विविध शाळांमध्ये शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मतदानाबाबत जागरूकता वाढविणारी पथनाट्ये बसविली.

नवी मुंबई महापालिकेच्या शाळांप्रमाणेच अनेक खाजगी शाळांमधूनही शिक्षक व विद्यार्थ्यांनी एकत्र येत नागरिकांनी आपला मतदानाचा



हक्क बजवावा, असे आवाहन करणारी पथनाट्ये आपापल्या शाळा परिसरात सादर केली. विशेष म्हणजे ही पथनाट्ये शिक्षक व विद्यार्थी यांनी मिळूनच लिहिलेली होती व शिक्षकांनी पथनाट्य स्वरुपात बसवून घेतली होती.

ही पथनाट्ये शाळेच्या परिसरात सादर होत असताना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभल्याचे चित्र पहायला मिळाले. या पथनाट्यांच्या माध्यमातून भारतीय संविधान, लोकशाहीच्या सबलीकरणात मतदानाचे महत्त्व, संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार, कर्तव्य म्हणून मतदान करण्याची नागरिकांची जबाबदारी अशा आशयास अनुसरुन मतदान करण्याचे संदेश प्रसारण पथनाट्यांतून करण्यात आले.

२५ ठाणे लोकसभा निवडणूक २० मे रोजी होणार असून मतदानाची टक्केवारी वाढावी यादृष्टीने मतदार जनजागृतीकरिता नवी मुंबई महापलिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार विविध माध्यमांचा वापर करण्यात येत आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागानेही या कामी पुढाकार घेतला असून स्वीप कार्यक्रमांतर्गत १५० ऐरोली व १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघ कार्यालयाच्या सूचनांनुसार रांगोळी, चित्रकला, प्रभात फेऱ्या, निबंध, पोस्टकार्ड लेखन असे अभिनव उपक्रम शाळांतून राबविलेले आहेत.

शिक्षण विभागाचे उपायुक्त योगेश कडुसकर, शिक्षणाधिकारी अरुणा यादव, क्रीडा अधिकारी अभिलाषा म्हात्रे, शिक्षण विस्तार अधिकारी सुलभा बारघरे व कल्पना गोसावी यांच्या नियंत्रणाखाली केंद्र समन्वयक यांच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या शाळांसह खाजगी शाळांनाही मतदान विषयक जनजागृतीपर स्वीप कार्यक्रमात सहभागी करून घेण्यात आले आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांमार्फत पालकांकडे मतदान करण्याचा संदेश प्रभावी रितीने पोहचविला जात आहे. शाळांनी आपापल्या क्षेत्रात सादर केलेली पथनाट्ये ही मतदान विषयक जनजागृतीचे प्रभावी माध्यम ठरली.

# दुचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये नवीन खाजगी दुचाकी वाहनांसाठी एमएच ४६ सीएस या नवीन मालिका लवकरच सुरु होत असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल यांनी कळविले आहे.

या मालिकेतील आकर्षक/अनाकर्षक नोंदणी क्रमांक राखीव करायचे असल्यास नागरिकांनी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयात संपर्क साधावा.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५७अ नुसार विहित केलेले आकर्षक नोंदणी क्रमांक व त्यासाठीचे शुल्क याबाबतची सविस्तर माहिती, पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. एकाच नोंदणी क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्जदारांनी अर्ज केल्यास उक्त नमूद तरतूदीनुसार नोंदणी क्रमांकासाठी जाहीर लिलाव केला जाईल, याची नोंद घेण्यात यावी, असे पनवेलचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी पनवेल कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील उरण, पनवेल, कर्जत व खालापूर तालुक्यातील नागरिकांना एका प्रसिध्दी पत्रकान्वये आवाहन केले आहे.

# विविध उपक्रमांतून नवी मुंबईत मतदानविषयक व्यापक जनजागृती



**नवी मुंबई : बातमीदार**

प्रत्येक नागरिकाने लोकसभा निवडणूकीत आपला मतदानाचा हक्क बजावावा यादृष्टीने स्वीप उपक्रमांतर्गत मोठया प्रमाणावर जनजागृती करण्यात येत असून त्याकरिता विविध माध्यमांचा वापर करण्यात येत आहे. यामध्ये ज्या ठिकाणी लोक जास्त संख्येने एकत्र येतात अशा समारंभ, उत्सव या कार्यक्रमांठिकाणी जाऊन मतदान करण्याचे महत्त्व पटवून दिले जात आहे तसेच मतदान शपथ घेऊन मतदानाचे आवाहन करण्यात येत आहे.

समाजातील विविध घटकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविण्यासाठी विविध माध्यमांतून प्रयत्न करण्यात येत असून कोपरखैरणे येथील स्त्री मुक्ती संघटनेच्या कार्यालयात परिसर सखी विकास संस्थेच्या वतीने आयोजित कचरा वेचक महिलांच्या विशेष कार्यक्रमाप्रसंगी १५० ऐरोली विधानसभा मतदारसंघाच्या सहा. निवडणूक निर्णय अधिकारी सुचिता भिकाने यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीपच्या नोडल अधिकारी तथा नमुंमपा क्रीडा अधिकारी अभिलाषा म्हात्रे व सहा. नोडल अधिकारी विभा सिंग यांनी कर्मचाऱ्यांसमवेत कचरा वेचक महिलांचे मतदान करण्याविषयी प्रबोधन केले. या वेळी उपस्थित महिलांनी आपण स्वत: तर मतदान करूच आणि इतरांनाही मतदान करण्यास सांगू, अशी सामुहिक शपथ ग्रहण केली.

पटनी रोड येथील वेस्ट साइड व क्रोमा या मोठ्या व्यावसायिक दुकानांमध्येही मतदान विषयक जनजागृती करण्यात आली. अशा स्वरूपाच्या सर्व मोठया आस्थापनांना व संस्था कार्यालयांना भेटी देऊन मतदानाचे आवाहन केले जात आहे. ऐरोली येथील मध्यवर्ती पोस्ट ऑफिस मध्येही जाऊन तेथील अधिकारी-कर्मचारी व पोस्टमन यांचे मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी प्रबोधन करण्यात आले. तसेच ऐरोलीगावातील उत्सवाप्रसंगीही मतदानाचे आवाहन करण्यात आले.

दिघा विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. कैलास गायकवाड यांनीही आपल्या कर्मचाऱ्यांसमवेत मतदान करण्याची शपथ घेत जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत लोकसभा निवडणूकीत मतदान करण्याविषयीचे आवाहन पोहोचविण्यासाठी प्रत्येक अधिकारी-कर्मचारी यांनी आपले योगदान दयावे असे सूचित केले. २० मे रोजी २५ ठाणे लोकसभा मतदार संघाची निवडणुक होत असून यामध्ये प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीच्या सबलीकरणाला हातभार लावावा यादृष्टीने क्षेत्रीय स्तरावर व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी यापूर्वीच आढावा बैठकीत दिले असून त्या अनुषंगाने महापालिका स्तरावरूनही मतदार जनजागृतीपर उपक्रम राबविले जात आहेत.



















**पनवेल :** भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, आरपीआय, पीआरपी, रासप व मित्रपक्ष महायुतीचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ पनवेलमधील कोळीवाडा येथे गुरुवारी सभा झाली. तत्पूर्वी खासदार श्रीरंग बारणे यांनी शहरातील आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन केले. या वेळी त्यांच्यासमवेत भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव आदी पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, खैरणे, नावडे या ठिकाणीही महायुतीच्या सभा झाल्या.

निवडक



## हिवताप दिनानिमित्त जनजागृती

**मुरुड** : आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्रात हिवताप दिनानिमित्त जनजागृती करण्यात आली. या वेळी आरोग्यसेवक सुशील ठाकूर यांनी सांगितले की, घरातील वापारात असणारी भांडी आठवड्यातून एक दिवस कोरडी ठेवून कोरडा दिवस पाळावा, घरोघरी ताप रुग्णांचा सर्वेक्षण करून संशयित रुग्णांना आरोग्यसेविका, सेवकांनी रक्तनुमना संकलन करून तपासणी करावी. हिवतापमुक्ती करण्यासाठी नागरिकांनी आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. हिवतापाचा प्रसार, प्रतिबंध व उपचार याबाबत माहिती देऊन जनजागृती करण्यात आली. या वेळी वैद्यकीय अधिकारी उज्वलदिप बांबर्डे, आरोग्य सहाय्यक संतोष नागावकर, आरोग्यसेविका उज्ज्वला रणदिवे, सोनाली मोरे, नर्स, आशावर्कर्स उपस्थित होते.

## समीर खान यांना 'कोकण उद्योगरत्न'

**पेण** : उद्योजक समीर खान यांना नुकताच कोकण उद्योगरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा



सन्मान सोहळा ठाणे येथे झाला. मराठी अभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या हस्ते समीर खान यांना कोकण उद्योगरत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. रिअल इस्टेट व बँकिंग क्षेत्रात त्यांच्या कामगिरीसाठी त्यांना हा सन्मान देण्यात आला आहे. समीर खान याला बिझनेस एक्सेलन्स अवॉर्ड मिळाल्याने सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## जुनाट वृक्ष तोडण्याची मागणी

**माणगाव** : नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव येथील शासकीय विश्रामगृहाजवळ विद्युत पुरवठा करणाऱ्या डीपीला अडचणीचा ठरणारा जुनाट मोठा वृक्ष पावसाळ्यापूर्वी तोडावा, अशी मागणी स्वीकृत नगरसेवक सिराज परदेशी यांनी करून निवेदन दिले आहे. निवेदनात, शासकीय विश्रामगृहाजवळ विद्युत पुरवठ्याची डीपी आहे. या डीपीजवळून एसटी लाईन व सर्व्हिस लाईन अशा दोन्ही लाईन गेल्या असून त्या डीपीजवळ फार मोठा जुनाट वृक्ष आहे. हा वृक्ष पावसाळ्यात एसटी सर्व्हिस लाईनवर पडून सर्व लाईन बंद होऊ शकतात. त्यामुळे हा वृक्ष पावसाळ्यापूर्वी तोडण्यात यावे, असे निवेदनात म्हटले आहे.

# अखाद्य बर्फामुळे पेणमध्ये काविळीची साथ

## शीतपेयांच्या दुकानांमध्ये होतेय खुलेआम भेसळ

**पेण : प्रतिनिधी**

उन्हाळाचा पारा वाढत आहे. यामुळे आपसूकच पावले रस्त्याच्या कडेला असलेल्या रसवंतीगृह, ज्यूस सेंटर तसेच लिंबू सरबतच्या हातगाड्या आणि टपऱ्यांकडे वळतात, परंतु पेण शहरात अखाद्य बर्फाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असून पेणकरांच्या आरोग्याशी हा खेळ सुरू आहे. या अखाद्य बर्फामुळे पेणमध्ये काविळीची साथ पसरली आहे.

पेण तालुक्यात एकच बर्फ तयार करण्याचा कारखाना आहेत. संपूर्ण पेण तालुक्याला या एकाच बर्फाच्या कारखान्यातून बर्फाचा पुरवठा केला जातो. या कारखान्यातून उद्योगासाठी वापरला जाणारा बर्फ तसेच खाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या बर्फाचे उत्पादन होते. उद्योगासाठी लागणारा बर्फ हा दूध, मासे आणि रासायनिक उत्पादनांचे कूलिंग करण्यासाठी तयार केला जातो.



या बर्फातील सर्वच घटक आरोग्याच्या दृष्टीने फार घातक असतात, मात्र हाच बर्फ खाण्यासाठीही वापरला जातो. असे असतानाही औद्योगिक वापरासाठी असलेल्या बर्फाची खाद्यपदार्थ म्हणून विक्री होत आहे.

कूलिंगसाठी वापरला जाणारा बर्फ हा खाद्यासाठी लागणाऱ्या बर्फाच्या तुलनेत स्वस्त असतो. यामुळे रसवंतीगृह असा स्वस्त बर्फ सर्रास वापरतात. येथील बर्फ बनविणाऱ्या कारखान्यांकडे अन्न व औषध प्रशासन विभागाचे परवाने आहेत, परंतु बर्फ मात्र अखाद्य स्वरूपाचा तयार केला जात असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे पेण तालुक्यात सध्या काविळ या आजाराच्या रुग्णांची संख्या कमालीची वाढली आहे.

### बर्फ नको, 'आईसक्यूब' हवा

आईसक्यूब हा खाण्यायोग्य बर्फ आहे, परंतु हा महागडा बर्फ असल्याने याचा वापर मोठ्या हॉटेलमध्येच होतो. अखाद्य बर्फ बनविणाऱ्या कंपन्या आपला बर्फ मोठा व्हावा व जास्त वेळ टिकावा यासाठी अमोनियाचा वापर करतात. त्यांच्या जोडीला विविध वायू आणि दूषित पाणी असते म्हणून तो अशुद्ध असतो. काही रसवंतीगृहाच्या मालकांनी सांगितले की, आईसक्यूब खाण्यालायक असला तरीही या बर्फाच्या प्रमाणाचा अंदाज नाही. त्यामुळे रसामध्ये तो बर्फ जास्त पडून रस पातळ होतो. म्हणून आम्ही आईसक्यूब न वापरता बर्फाची लादी मागवतो.

**अपुऱ्या मनुष्यबळाअभावी आम्ही येथील बर्फ बनविणाऱ्या कारखान्यांची तपासणी करू शकलो नाही. विक्रेत्यांनी या कारखान्यांकडून बर्फ विकत घेताना तो खाण्याचा बर्फ आहे असे बिल घ्यायला हवे आणि कारखान्यांनीदेखील ते सक्तीने द्यायला हवे. सामान्य लोकांना हा बर्फ काचेसारखा चकाचक व पारदर्शक दिसतोय ना हे पहायला हवे. बर्फ तपासणीची लवकरच मोहीम सुरू केली जाणार आहे.**
**-मारुती घोसलवाड, सहाय्यक आयुक्त, अन्न आणि औषध प्रशासन, पेण-रायगड**

# नागोठण्यातून तटकरेसाहेबांना भरघोस मताधिक्य द्या

## आमदार अनिकेत तटकरे यांचे आवाहन; प्रचाराचा शुभारंभ

**नागोठणे : बातमीदार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी तसेच जनतेची पुन्हा सेवा करण्यासाठी येत्या ७ मे रोजी खासदार तटकरेसाहेबांच्या पारड्यात भरघोस मताधिक्य टाका, असे आवाहन आमदार अनिकेत तटकरे यांनी केले.

नागोठणेचे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिरात श्रीफळ वाढवून मातेचा आशीर्वाद घेऊन महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांचा नागोठणे विभागातील प्रचाराचा शुभारंभ आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला. त्या वेळी महायुतीच्या कार्यकर्त्यांना आवाहन करताना आमदार तटकरे बोलत होते.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नरेंद्र जैन, भाईसाहेब टके, सदानंद गायकर, शिवराम शिंदे, हरीश काळे, डॉ. राजेंद्र धात्रक, मधुकर ठमके, संतोष कोळी, बाळासाहेब टके, भाजपच्या उरण नगरसेविका जान्हवी पंडित, राष्ट्रवादी महिला कार्यकर्त्या रिचा धात्रक, पूनम इप्ते, प्रतिभा तेरडे, मनसे नेते गोवर्धन पोलसानी, भाजप नेते आनंद लाड, सचिन मोदी, भाजप महिला नेत्या श्रेया कुंटे, प्रियांका पिंपळे, शिवसेना नेते मनोज खांडेकर, प्रवीण ताडकर, अमित खांबकर, आरपीआय नेते संतोष गायकवाड आदींसह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# खोपोली पोलिसांकडून शहरात पथसंचलन



**खोपोली : प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीच्यानिमित्ताने शहर व परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या पार्श्वभूमीवर खोपोली पोलीस ठाण्याच्या वतीने शहरात विविध भागात पथसंचलन करण्यात आले.

खालची खोपोली अग्निशामक दल केंद्र येथून प्रारंभ झालेले पथसंचलन मुख्य बाजारपेठ, जैन मंदिर, समाजमंदिर रोड, विणानगर, शास्त्रीनगर, पंत पाटणकर चौक, शिळफाटा विभाग, पटेल नगर व छत्रपती शिवाजी महाराज स्मारक चौक आदी भागातून पतसंचलन करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, पोलीस निरीक्षक शीतलकुमार राऊत, एक सहाय्यक पोलीस निरीक्षक, सहाय्यक उपनिरीक्षक, २० पोलीस कर्मचारी, त्याचप्रमाणे सीमा सुरक्षादलाचा एक अधिकारी व ४६ कर्मचाऱ्यांनी या पथसंचलनात सहभाग घेतला.

# कर्जतमधील विहिरींचे अस्तित्व धोक्यात

**कर्जत : प्रतिनिधी**

पाच-सहा गुंठ्यांचा प्लॉट, त्यामध्ये नारळ, केळी, शेवग्याची झाडे, थोडीफार फुलझाडे, कौलारू घर आणि घराच्या मागे अथवा पुढच्या बाजूस एक विहीर असे छानसे चित्र पूर्वी कर्जत शहर आणि परिसरात दिसे. त्यामुळे कर्जत विहिरींचे नगर असे म्हटल्यास वावगे ठरू नये, मात्र बदलत्या काळात कर्जत शहरातील हे चित्र झपाट्याने बदलले असून वाढत्या गृहसंकुलाच्या उभारणीत या विहिरी नामशेष झाल्या आहेत.

जीवनात पाण्याला फार महत्त्व आहे. त्यामुळे पाण्यान भरलेल्या या विहिरी त्या घरांच्या वैभवात भर घालत असे. विहिरीवर रहाट बसवून गरज भासेल, तसे पोहऱ्याने पाणी सहज बाहेर काढता येत असे. त्यामुळे वीजपुरवठा खंडित असला तरी लोकांची गैरसोय होत नसे. विहिरीतील मोठ्या प्रमाणात असलेल्या थंडगार पाण्याच्या



साठ्यामुळे साहजिकच आजूबाजूला गारवा जाणवत असे. विहिरीला अनेक झरे असल्याने पाणीही भरपूर असायचे. अगदी मे महिन्यातही पाण्याची चिंता नसायची, मात्र मागील काही वर्षांत हे चित्र पूर्णपणे बदलत गेले.

मुंबई, पुण्याच्या मध्यावर असल्याने तसेच मध्ये रेल्वे मार्गावरील वाढती लोकल सेवा अन्य रस्ते अशा वाढत्या दळणवळण, सोयीसुविधेमुळे कर्जतला घर घेण्यासाठी अधिक पसंती मिळू लागली. त्यातच कर्जत-पनवेल लोकल सुरू होणार असल्याने पसंती वाढू लागली.

परिणामी एके काळी बैठी घरे पाडली जाऊन त्या जागेवर तीन-चार मजली इमले उभे करण्याचे काम विकासकांनी हाती घेतले, मात्र हे काम करताना या जागेमधील झाडे, विहिरी अडचणीच्या ठरू लागल्या. त्यामुळे बहुतांश विकासकांनी या विहिरी बुजवल्या तर काहींनी त्यावर स्लॅब टाकून त्यावर इमारतींचे बांधकाम चढवले. त्यामुळे विहिरींचे अस्तित्वालाच धोका पोहचला असून कधी काळी एक गाव...विहिरींचे अशी असलेली ओळख आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

# नागोठण्याची ग्रामदेवता जोगेश्वरी माता पालखी सोहळ्याचा समारोप

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठण्याची ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराज यांचा पालखी सोहळा बुधवारी सुरू झाला होता. तिसऱ्या दिवशी शुक्रवारी (दि.२६) जवळजवळ ५३ तासांनी पालखी मंदिरात पोहचल्यानंतर ग्रामस्थांकडून आरती करून पालखी सोहळ्याची सांगता करण्यात आली. त्यानंतर श्री जोगेश्वरी मातेचे दागिने व श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराज यांचे मुखवटे विश्वस्त कमिटीचे अध्यक्ष नरेंद्र जैन व सचिव भाईसाहेब टके यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले.

श्री जोगेश्वरी मातेचा हा पालखी सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. पालखी सोहळ्याला सहकार्य करणारे नागोठणे ग्रामपंचायत, नागोठणे पोलीस ठाणे, वीज वितरण कंपनी, नागोठण्यातील अनेक संस्था, संघटना, सामजिक मंडळे, तसेच



प्रत्येक आळीतील अध्यक्ष, ग्रामस्थ या सर्वांचे उत्सव समितीच्या वतीने अध्यक्ष नितीन राऊत यांनी आभार मानले.

पालखी सोहळा निर्विघ्नपणे यशस्वीपणे पार पाडण्यासाठी श्री जोगेश्वरी माता विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन, सचिव भाईसाहेब टके यांच्या मार्गदर्शनाखाली उत्सव समितीचे अध्यक्ष नितीन राऊत, उपाध्यक्ष रुपेश नागोठणेकर, सचिव मंगेश कामथे, खजिनदार प्रथमेश काळे, विश्वस्त समिती, उत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थांनी मेहनत घेतली.

# कर्जतमध्ये निवडणूक नियंत्रण कक्ष स्थापन

**कर्जत : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघात असलेल्या कर्जत विधानसभा मतदारसंघात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. मतदारसंघात आचारसंहिता राबविण्यासाठी जनतेला आचारसंहिता भंगाविषयक तक्रारी मांडण्यासाठी आणि त्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन सुरू झाला आहे.

कर्जत येथील प्रशासकीय भवनात हा नियंत्रण कक्ष सुरू झाला असून जनतेसाठी मोबाईल आणि दूरध्वनी क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत. १६ मार्चपासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. तक्रार करण्यासाठी त्यासाठी दूरध्वनी (०२१४८-२२२०३७, ९३७३९२२९०९) आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांनी दिली.

# मुरूडमध्ये शिक्षकांची मतदार जागृती रॅली





**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. बोर्ली आणि मांडला केंद्रातील शिक्षक आणि शिक्षिकांनी मतदान जनजागृती करण्यासाठी रॅली काढून विविध घोषणा दिल्या.

मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो! अशा आशयाच्या घोषणा देऊन मतदार बांधवांचे लक्ष वेधून घेण्यात या रॅलीने महत्त्वाची भूमिका बजावल्याचे चित्र जाणवले.

या वेळी केंद्रप्रमुख मोहिनी पाटील, पदवीधर शिक्षक महेश कवळे, शरद पाटील, जयवंत पाटील, देवेंद्र तांडेल, महेश भगत, प्रवीण भगत, संतोष पुकळे, महेंद्र सातामकर, अपेक्षा म्हात्रे, मानसी कवळे, रमाकांत ठाकूर, राजेंद्र पाटील, चंद्रकांत काटकर, मिस्त्रिकसर, रुपाली वाजंत्री आणि इतर शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## नगर परिषद कर्मचारी बाईकवर स्वार

लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून स्वीप कार्यक्रमांतर्गत नगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी, पाणीपुरवठा व सफाई कर्मचाऱ्यांनी बाईकला मतदानाविषयी जनजागृतीपर संदेश लावून शहरात बाईक रॅली काढली. या वेळी प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज अनिल भुसे, आरोग्य निरीक्षक राकेश पाटील, प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, लिपीक मनोज पुलेकर, संजय वेटकोळी, संजय बामगुडे, सतेज निमकर, मुकादम अभिजीत चांदारेकर, सिटी को-ऑर्डिनेटर सचिन कोरके आदींसह सर्व कर्मचारी सहभागी झाले होते. रायगड लोकसभा मतदारसंघात ७ मे रोजी मतदान असून या दिवशी सर्वांना मतदान करता यावे म्हणून सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. सर्व जागरूक मतदारांनी कुठल्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करावे, असे आवाहन प्रशासक पंकज अनिल भुसे यांनी या वेळी केले.

# श्री बहिरीदेवाचा पालखी सोहळा उत्साहात

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील बहिरीचा पाडा येथे प्रसिद्ध बहिरीदेव मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या बहिरीदेवाचा पालखी सोहळा उत्साहात झाला. पहाटे मंदिर व्यवस्थापक हरिश्चंद्र पाटील यांनी कुटुंबियांसमवेत महापूजा, अभिषेक, आरती केली.

यानंतर दिवसभरात हजारोंच्या संख्येने भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. दुपारी उंच काठ्यांच्या स्पर्धा झाल्या.

पालखीचे वैशिष्ट्य म्हणजे पालखीच्या पुढे भाविक काटेरी पेरी पाठीवर मारतात. पाठ रक्तबंबळ होते, मात्र भाविकांना आजवर कुठल्याही वेदना जाणवल्या नाहीत असे भाविक सांगतात. हा सोहळा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक आवर्जून येतात. पालखी सोहळ्यात महिलांचे सांस्कृतिक नृत्य, युवा युवती ढोल ताशे वाद्यांच्या तालावर नृत्य करतात. पालखी संपूर्ण गावात फिरून श्री बहिरी देव मंदिराला पाच प्रदक्षिणा घातल्या जातात.

पालखी पुन्हा पाटील परिवार देव्हाऱ्यात आणल्यानंतर पालखी सोहळ्याची सांगता होते. त्यानंतर रात्री सांस्कृतिक कार्यक्रम कलावंतांनी सादर केला.





# बंगळुरूची हैदराबादवर मात



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या १७व्या हंगामातील ४१वा गुरुवारी सामना राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने सनरायझर्स हैदराबादचा ३५ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने विराट-रजतच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर २०६ धावांचा डोंगर उभारला होता. प्रत्युत्तरात हैदराबादचा संघ १७१ धावाच करू शकला.

२०७ धावांच्या लक्ष्याला पाठलाग करताना सनरायझर्स हैदराबादची सुरुवात खराब झाली. ट्रॅव्हिस हेडला अवघी एकच धाव करता आली. एडन मार्करमनेही केवळ सात धावांचे योगदान दिले. अभिषेक शर्माने १३ चेंडूंत ३१ धावा केल्या, पण त्याला मोठी खेळी खेळता आली नाही. हैदराबाद संघाने सातत्याने विकेट गमावल्या. त्यामुळे संपूर्ण संघ २० षटकांत आठ विकेट गमावून केवळ १७१ धावा करू शकला. शाहबाज अहमदने संघासाठी नाबाद ४० धावा निश्चित केल्या. कर्णधार पॅट कमिन्सनेही ३१ धावा केल्या, पण ते दोघेही संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत. आरसीबीकडून स्वप्नील सिंग, कर्ण शर्मा आणि कॅमेरून ग्रीन यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर विल जॅकने एक विकेट घेतली.

तत्पूर्वी, या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत सात गडी गमावून २०६ धावा केल्या होत्या. विराट कोहलीने संघासाठी ४३ चेंडूंत सर्वाधिक ५१ धावा केल्या. त्याचबरोबर रजत पाटीदारने २० चेंडूंत ५० धावा चोपल्या. यात त्याने दोन चौकार आणि पाच षटकार मारले. कॅमेरून ग्रीननेही २० चेंडूंत नाबाद ३७ धावा केल्या. हैदराबादकडून जयदेव उनाडकटने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या.

आरसीबीने बरोबर एका महिन्यानंतर आणि सहा पराभवानंतर यंदाच्या हंगामातील आपला दुसरा विजय नोंदवला. दुसरीकडे या सामन्यापूर्वी यंदाच्या आयपीएलमधील सनरायझर्स हैदराबाद हा एकमेव संघ होता, ज्याने घरच्या मैदानावर एकही सामना गमावला नव्हता, मात्र आरसीबी संघाने हे वर्चस्व संपुष्टात आणले आहे. या सामन्यापूर्वी हैदराबादने चालू मोसमात घरच्या मैदानावर दोन सामने खेळले व दोन्ही जिंकले होते.

# सोके कप कराटे स्पर्धा उत्साहात

**मोहोपाडा, उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

मोहोपाडा येथील साई मंदिराच्या सभागृहात गोशीन रियू कराटे असोसिएशनची चौथी सोके कप स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत १५० खेळाडू सहभागी झाले होते. विविध वयोगटातील खेळाडूंनी काता व कुमिते या प्रकारात पदके पटकविली.

अभिज्ञा पाटील, सृष्टी सरोज, आर्या गावंड, वेदा ठाकरे यांनी दोन सुवर्ण; सुशांत राजपूत, श्लोक ठाकूर, साक्षी पंडित, अमिषा घरत, हृदवी म्हात्रे, प्रणम्या पुजारी यांनी सुवर्ण व रौप्य; सिया फोफेरकर, रूद्र ठाकूर, श्रुजा गावंड, सोज्वल पावसकर, नीरज थोरात, दिव्या भारद्वाज यांनी सुवर्ण व कांस्य; स्पर्धेत स्वरा म्हात्रे, कार्तिकी पाटील, अनुष्का खारकर, प्रत्युषा पाटील दोन रौप्य; मिताली घबाडी, हीर सेन, दीक्षांत उबाळे रौप्य व कांस्य; वेदा पाटील, सिद्धी अल्लाद, श्रेयश कांबळे यांनी दोन कांस्यपदके जिंकली.



स्पर्धेचे आयोजन शिहान राजू कोळी, सुलभा कोळी, आनंद खारकर राकेश म्हात्रे भूपेंद्र माळी, रेश्मा माळी, भोपी अंजा माने, रियाज अन्सारी यांनी या केले होते.

पंचांचे काम सिहान राहुल तावडे, शिहान मतीवानंद, सिंहान अरविंद भोपी, गोपाळ म्हात्रे, परेश पावस्कर, अमिषा घरत, सनी खेडेकर, मुमुक्षा, तनिष यांनी पाहिले.

या वेळी राकेश म्हात्रे, परेश पावसकर, राजेश कोळी, भूपेंद्र माळी, रेश्मा माळी, भोपी अंजा माने यांना सेकंड डिग्री ब्लॅक बेल्ट; तर सुलभा कोळी, शितल गणेशकर, निकिता कोळी, विघ्नेश कोळी, जगदीश्वरी यांना फर्स्ट डिग्री ब्लॅक बेल्ट प्रदान करण्यात आला. शिहान वसंथन मलेशिया कोच इंडिया रिप्रेजेंटेटिव्ह यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# कराटे स्पर्धेत खेळाडूंचे यश



**उरण : बातमीदार**

मोहोपाडा साई मंदिर येथे गोशीन रियू कराटे असोसिएशनच्या वतीने आयोजित चौथ्या सोके कप स्पर्धेत विजय विकास सामाजिक संस्थेच्या खेळाडूंनी यश मिळविले आहे. काता आणि कुमिते प्रकारात खेळाडूंनी पदके जिंकली.

साईराज कडू, आराध्य झावरे, शुभम घोगरे यांनी काता कुमितेमध्ये सुवर्ण, आशीर्वाद सिंग, हर्षित देवगड, पार्थ घरत, शिवांश सिंग यांनी काता प्रकारात सुवर्ण, कुमिते प्रकारात रौप्य, अथर्व फड, आशिष सिंग, मृदुल म्हात्रे यांनी कुमिते सुवर्ण व काता रौप्य, आदित्य अहिरे, स्वरा जाधव, भक्ती भोईर यांनी काता रौप्य, कुमिते कांस्य, सार्थ म्हात्रेने काता कुमितेमध्ये कांस्यपदक प्राप्त केले.

सिनिअर इन्स्ट्रक्टर विकास भोईर, सागर कडू, प्रगती भोईर-घरत आणि ज्युनिअर इन्स्ट्रक्टर अथर्व घरत यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी एकूण १० सुवर्ण, नऊ रौप्य आणि आठ कांस्यपदके पटकावली.

# रायगड पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अथर्व, आर्या, अमृता, संस्कार विजेते

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या वतीने जिल्हास्तरीय सब ज्युनिअर, ज्युनिअर, (क्लासिक आणि इक्विप) स्पर्धा नुकतीच नवीन पनवेल येथे झाली. या स्पर्धेत अथर्व लोधी (ज्युनिअर स्ट्राँग बॉय, संसारे फिटनेस पेण), आर्या शिंदे (सब ज्युनिअर स्ट्राँग गर्ल, जीव्हीआर, कर्जत) अमृता भगत (ज्युनिअर स्ट्राँग गर्ल, पॉवर हाऊस खोपोली) आणि सब ज्युनिअर संस्कार सरदार (स्पार्टन जिम खोपोली) हे विजेते झाले.

या स्पर्धेत महाड, माणगाव, कर्जत, खोपोली, पनवेल, पेण येथील ५०हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन मास्टर्स स्पर्धा राष्ट्रीय पदक विजेता खेळाडू अंकुश सावंत (मुंबई) यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभास पनवेल तालुका कुणबी समाजाचे माजी अध्यक्ष रमेश



फळसमकर, विद्यमान उपाध्यक्ष आणि पॉवरलिफ्टिंग रायगडचे कार्यकारिणी सदस्य सुभाष टेंबे, मुंबईचे पंच अंकुश सावंत, समीर दळवी, सुरेश धुळप, जितेंद्र यादव, पॉवरलिफ्टिंग रायगडचे सचिन भालेराव, संदीप पाटकर,राहुल गजरमल आदी उपस्थित होते.

स्पर्धेचे सांघिक विजेतेपद आयर्न मेट जिम (खोपोली) आणि उपविजेतेपद संसारे फिटनेस (पेण) यांनी मिळविले. पंच म्हणून अमोल कडूस्कर (ठाणे), राजेश शिर्के (मुंबई उपनगर), गोपीनाथ पवार (मुंबई), सुनील अडसूळ (मुंबई) आदींनी काम पाहिले.

स्पर्धेचे नियोजन संदीप पाटकर, सचिन भालेराव, राहुल गजरमल आणि सुभाष टेंबे यांनी केले होते, तर स्पर्धेस नवनाथ गायकर (ठाणे), गणेश तोटे (पनवेल), विक्रांत गायकवाड व कुणाल पिंगळे (खोपोली), बबन झोरे (कर्जत) यांचे सहकार्य लाभले. सर्व स्पर्धकांसाठी गुरूद्वारा, गुरूनानक चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने लंगर सेवेद्वारे भोजन व्यवस्था करण्यात आली होती.









**पेण : रायगड लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, आरपीआय, पीआरपी, रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ नगरपालिकेच्या मैदानावर भव्य जाहीर सभा झाली. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मार्गदर्शन केले. सभेला सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, पालकमंत्री उदय सामंत, विधान परिषदेतील भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर यांच्यासह लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**






वर्ष १९ वे

वाचावी ज्ञानेश्वरी । डोळा पहावी पंढरी ॥१॥
ज्ञान होय अज्ञानासी । ऐसा वर त्या टीकेसी ॥२॥
ज्ञान होय मूढा । अति मूर्ख त्या दगडा ॥३॥
वाचील जो कोणी । जनी त्यासी लोटांगणी ॥४॥

ज्ञानराज माझी योग्यांची माऊली॥ जेणे निगमवल्ली प्रगट केली॥

विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी॥

सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते॥

तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम॥

माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित

वै ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने

ह.भ.प. बानुबाई (कोपर) यांच्या उपस्थितीत

अखंड हरिनाम सप्ताह

ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वा.

व्यासपीठ चालक - ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)

दैनंदिन कार्यक्रम

पहाटे ४.०० ते ६.०० वा. -काकडा
सकाळी ८.३० ते १२.०० वा. -ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. -प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. -सामुदायिक हरिपाठ
रात्री ७.३० ते ९.३० वा. -किर्तन
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

| वार/दिनांक | प्रवचन (सायं. ४ ते ५) | किर्तन (रात्री ७.३० ते ९.३०) |
|---|---|---|
| शनिवार (दि. २७/०४/२०२४) | स. ८.३० वा. -ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन<br>सायं. ४ ते ५वा. - दिंडी सोहळा<br>व दिपोत्सव सोहळा | ह.भ.प. युवराज काका महाराज देशमुख (आळंदी देवाची)<br>कै. गिताबाई त्रिबंक देशमुख यांच्या स्मरणार्थ<br>सौजन्य: श्री विराज जयवंत देशमुख (गव्हाण) |

काल्याचे किर्तन रविवारी दि. २८ एप्रिल २०२४ रोजी सकाळी 10 ते 12 वा.
भागवताचार्य ह.भ.प. प्रविणजी महाराज पवार (संभाजीनगर)
कै. महेश रघुनाथ घरत यांच्या स्मरणार्थ सौजन्य : श्री. सचिनशेठ रघुनाथ घरत (शेलघर)


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com